दैनिक

रुबाबदार राज्याचा, जबाबदार विचार...

# लक्ष महाराष्ट्र

www.lakshamaharashtra.com lakshamaha.dhule@gmail.com lakshamaha.nsk@gmail.com RNI No.MAHMAR/2019/79184

धुळे-नंदुरबार-नाशिक आवृत्ती ▶ वर्ष ५ वे ▶ अंक : ७३ वा ▶ बुधवार दि.१७ जानेवारी २०२४ ▶ किंमत :२ रु. ▶ पृष्ठे : ६

खुशखबर... खुशखबर...
खास लोकांच्या आग्रहास्तव
पार्सल सेवा व रिटर्न बुकींग उपलब्ध
न्यू विजेयंत ट्रॅव्हल्स, धुळे
धुळे ते नागपुर, अमरावती, अकोला
स्लिपर कोच २X१ नॉन एसी बस
रात्री १०.३० वाजेला

संपर्क:- Mo.7035436897, (02562) 236897, 237896
दु.नं.१४, प्रबोधनकार ठाकरे संकुल,धुळे

## न्यूज कॉलम

### टोल नाक्याजवळ गुटखा जप्त

**धुळे ।** मुंबई - आग्रा महामार्गावरील लळींग टोल नाक्यानजीक स्थानिक गुन्हा शाखेने ४४ हजार १२६ रुपयांचा अवैध गुटख्याचा माल जप्त करून कारवाई केली. मध्य प्रदेशच्या सेंधव्या येथून नाशिककडे कारमधून (क्र. एम. एच. ४३ बी. के. ५९९३ ) गुटख्याची वाहतुक केली जात असल्याची माहिती मिळाल्याने एलसीबीचे निरीक्षक शिंदे यांनी पथकाला कारवाईचे आदेश दिले होते. त्यानुसार पथकाने चालक रऊफ युसुफ अख्तार (रा. सरकार नगर, पिंपळगाव बसवंत ता. निफाड) आणि सहचालक मुश्ताक मुक्तार यांना ताब्यात घेऊन गुटखा जप्त केला.

### किरकोळ कारणावरून एकाला बेदम मारहाण


**धडगाव ।** तालुक्यातील उमराणी खुर्द येथील उदयसिंग लाला पावरा यांना मारहाण करण्यात आली. भाईदास तान्या पावरा याच्यासोबत का फिरतो, या कारणातून धनसिंग उर्फ धन्या मालसिंग पावरा याने उदेसिंग पावरा यांना मारहाण केली. दगडाने पायावर मारून उदेसिंग पावरा यांना जखमी केले. तसेच शिवीगाळ करुन जीवे ठार मारण्याची धमकीही देण्यात आली.

### बनावट नोटाप्रकरणी एकाला कारावास

**नाशिक ।** सुरगाणा येथे बनावट नोटा जवळ बाळगून व चलनात आणण्याचा प्रयत्न केल्याप्रकरणी एकाला जिल्हा प्रमुख न्यायधीशांनी तीन वर्षे सश्रम कारावासाची शिक्षा ठोठावली आहे. मुनव्वर बहिसुद्दीन शेख (रा. जतपूर, कलकत्ता, पश्चिम बंगाल) असे शिक्षा ठोठावण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. बनावट नोटा आढळून आल्या होत्या.

# शिवसेनेचे अध्यक्ष होण्याची तुमची लायकी आहे का; ठाकरे यांचा एकनाथ शिंदेंना टोला

**मुंबई । लक्ष महाराष्ट्र वृत्त**



सुप्रीम कोर्टाकडून आशा आहे, पण सुप्रीम कोर्टाने मानलेले सर्वोच्च न्यायालय हे जनता. आणि त्यांच्याकडे घेऊन आलो आहे. पोलिस संरक्षण न घेता नार्वेकरांनी व मिंदे यांनी जनतेत जावं आणि सांगावं की, शिवसेना कोणाची आहे. मग जनता ठरवेल?, जर शिवसेना आमची नसेल तर लोक माझ्यासोबत का येतात. मिंदे यांनी माझे आव्हान आहे की, राज्यपालांनी एक अधिवेशन बोलाववं, अध्यक्षांसमोर अविश्र्वास व्हीपचा मराठीत अर्थ होतो चाबूक, शिवसेनेचे अध्यक्ष होण्याची तुमची लायकी आहे का, असा घणाघात उद्धव ठाकरे यांनी शिंदेंना केले.

शिवसेना जर तुम्ही विकली असाल; तर मी जिथे जिथे जातो, तिथे तिथे शिवसैनिक माझ्यासोबत कसे? राज्यपालांना विनंती करतो, एक अधिवेशन पुन्हा बोलवा आणि मिंध्यांना सांगतो; विधानसभा अध्यक्षांविरोधात अविश्र्वास ठराव आणा, मी तुम्हाला पाठिंबा देतो. हाकला त्यांना! व्हीपचा अर्थ आहे चाबूक! चाबूक लाचारांच्या हातात शोभत नाही. शिवसेनाप्रमुखांच्या आणि शिवसैनिकांच्या हातात शोभतो, असे उद्धव ठाकरे म्हणाले. राहुल नार्वेकरांनी सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशांचे पालन न करता त्याचा विश्र्वासघात केला, नार्वेकरांनी अन्यायाचं नाव हे न्याय ठेवलं आणि निकाल दिला असा घणाघाती आरोप ॲड. असिम सरोदे यांनी केला. विधीमंडळ पक्ष हा पाच वर्षांसाठी असतो, त्यामुळे मूळ पक्ष हाच महत्त्वाचा आहे असं सर्वोच्च न्यायालयाने सांगूनही नार्वेकरांनी त्याचे पालन केलं नाही आणि बहुमताच्या आधारे निर्णय दिल्याचं सांगितलं. त्यामुळे नार्वेकरांचा निकाल हा लोकशाहीला मारक असल्याचंही ॲड सरोदे म्हणाले. शिवसेना आमदार अपात्रता प्रकरणी विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकरांनी कशा प्रकारे चुकीचा निर्णय दिला, त्यामध्ये नेमकं काय काय घडलं, नार्वेकरांनी कशा प्रकारे भाजपला योग्य असा निर्णय दिला याचा दावा आज उद्धव ठाकरे यांनी केला.

### लोकशाही जिवंत राहणार आहे की नाही?: ठाकरे

**उद्धव ठाकरे यांनी राजीनामा दिला म्हणून विचारतात, पण मी सत्तेचा पिपासू नाही. काही क्षणातच मी राजीनामा दिला. तुम्हाला कोर्टाने पुन्हा मुख्यमंत्री म्हणून बसवले होते. या राज्यपाल कोश्यारी हे संपूर्ण कटात सहभागी होते. लोकशाही जिवंत राहणार आहे की नाही? सर्वोच्च न्यायालयाचे अस्तित्व, वर्चस्व, अधिकार जीवंत राहणार आहे की नाही? जल्लादाचे काम या लवादाला दिले होते. आणि लवादा म्हणतो की, जन्माचा दाखलाच नाही. अरे तुला जन्माचा दाखला नाही बर का, जे निकाल द्यायला सांगितले होते ते करना बाबा, असा टोला उद्धव ठाकरे यांनी नार्वे कर यांना टोला लगावला.**

### शिंदे यांची नेतेपदी निवड ठाकरेंनी केली- परब

**एकनाथ शिंदे यांची शिवसेना नेते म्हणून उद्धव ठाकरे यांनी नियुक्ती केली होती. याचा व्हिडिओ या पत्रकार परिषदेतून दाखवण्यात आला होता. त्यावेळेचा हा वरील फोटो आहे. त्यानंतर अनिल परब म्हणाले की, हे सर्व पुरावे आम्ही निवडणूक आयोगाकडे दिले तरी देखील नार्वेकर म्हणतात की, माझ्याकडे निवडणूक आयोगाने जुनीच घटना दिली. त्या आधारे निकाल दिला आहे.**

### नार्वेकरांनी संविधानाची हत्याच केली: सरोदे

**राहुल नार्वेकरांनी विधिमंडळ पक्षाला सर्वकाही समजून निर्णय दिला. परंतु, बहुमत म्हणजे काय, सर्वोच्च न्यायालयाने सांगितले की, कायदेशीर नाव काय आहे. याला कायदेशीर नाव म्हणजे एकनाथ शिंदे व त्यांच्यासोबत पळून गेलेले लोक. १० व्या परिशिष्टाची केसच नाही,असे नार्वेकर म्हणतात. हा पक्षांतर कायद्याची केसच नाही. असे कसे म्हणू शकता. अन्यायच होणार असे लोकांना वाटत होते. चुकीचेच होणार हा जो लोकांचा विचार नार्वेकरांनी केला.**

## माझं कुठं चुकलं हे सांगितलंच नाही, नुसत्या शिव्याशाप दिल्या : नार्वेकर

**मुंबई । लक्ष महाराष्ट्र वृत्त**



उद्धव ठाकरेंच्या आजच्या कार्यक्रमाला पत्रकार परिषद म्हणावे, की दसऱ्यांचे भाषण पार्ट २ म्हणावे की गल्लीबोळात होणारी भाषणांची मालिका म्हणावी? असा खोचक सवाल विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वे कर यांनी केला आहे. तर या मेळाव्यातून मला वाटले की माझ्याकडून काही चुकीचा निर्णय घेण्यात आला की काही चुकले होते हे सांगण्यात येईल, परंतु राजकीय भाषणापलीकडे काही यात झाले नाही, असा टोला त्यांनी लगावला.

राहुल नार्वेकर पुढे बोलताना म्हणाले की, ठाकरे गटाच्या आजच्या कार्यक्रमात राज्यपाल हे फालतू माणूस आहे असे चुकीचे उद्गार वापरण्यात आले. सुप्रीम कोर्ट, निवडणमक आयोगासह विधानसभा अध्यक्ष यांच्याबद्दल चुकीचे शब्द प्रयोग करण्यात आला. यांना न्यायालय अध्यक्ष, राज्यपाल, यांच्यासह निवडणूक आयोगावर भरोसरा नाही मग यांचा संविधानावर विश्र्वास आहे का असा सवाल उपस्थित होत आहे. गेले ६ दिवस जे आरोप केले जात आहे. सात्यत्याने असे सांगिण्याचा प्रयत्न केला की, सुप्रीम कोर्टाच्या चौकटीच्या बाहेर जात निर्णय घेतला. अजय चौधरी यांच्या निवडीला सुप्रीम कोर्टाने योग्य ठरवले. तर एकनाथ शिंदे आणि भरत गोगावले यांच्या निवड अवैध ठरवली पाहिजे असे सांगण्यात येत आहे. विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर म्हणाले की, १० जानेवारी रोजी अपात्रतेच्या याचिके प्रकरणी जो निकाल मी जाहीर केला. तेव्हापासून आजपर्यंत काही पक्षाचे कार्यकर्ते आणि पदाधिकारी हे काही गैरसज पसरवत आहे. ते दूर करण्यासाठी लोकांसमोर त्या प्रकरणाचे स्पष्टीकरण लोकांसमोर येण्याची गरज आहे. निकालानंतर या स्पष्टीकरणाची गरज नाही, असेही त्यांनी म्हटले आहे.

# दुचाकीतून पेट्रोल चोरल्याचा वाद; दोन्ही गटातील ४८ जणांविरुध्द पोलिसात गुन्हा दाखल

**शिरपूर । लक्ष महाराष्ट्र वृत्त**

शहरातील कुंभार टेक परिसरात मोटरसायकलीतून पेट्रोल चोरण्याच्या वादातून दोन गटात तुफान हाणामारी झाली आहे. यावेळी दगडफेकही करण्यात आली. यात दोघे जखमी झाले.

याप्रकरणी परस्पर विरोधी फिर्यादीवरुन दोन्ही गटातील ४८ जणांविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यासंदर्भात, रवींद्र बाबुलाल बडगुजर (४९) रा. कुंभारटेक, शिरपूर यांनी पोलिसात दिलेल्या फिर्यादीनुसार घरासमोरील मदिना मोहल्ला परिसरात त्यांच्या मोटरसायकल (एमएच १८ / एएच-४७३०) मधून पेट्रोल कोणी काढले, असे नविद खलील शेख यास विचारले. याचा राग आल्याने तोसिफ खलील शेख याने शिवीगाळ केली. तर आकीब जावेद शेख, बाबा गुलाब मन्सुरी, अबुझर शाहिद शेख, दानिश तमिच बागवान, नदिम सलीम शेख, मुस्तकी शेख, शाहीद शेख, सईद सलीम पिंजारी, सादिक सलीम पिंजारी, सलमान सलीम पिंजारी, सादीक शेख उर्फ काल्या, साहिल आदिल सैय्यद सर्व रा. मदिना मोहल्ला, शिरपूर व इतर १५ ते २० जणांनी दहशत निर्माण करण्याच्या उद्देशाने दगडफेक केली. यात विष्णू महादू वाणी हे जखमी झाले. दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की,मदिना मोहल्ला येथे त्यांचा मुलगा नावेद शेख व त्याचा मित्र साहिल आदिल सय्यद या दोघांना रवींद्र बडगुजर यांनी मोटरसायकलमधून पेट्रोल का काढले, अशी विचारणा केली. नावेद व साहिल यांनी पेट्रोल काढले नाही, असे सांगताच बडगुजर यांनी तोसिफ याच्या कानाखाली मारले. तसेच माळी गल्लीतील लोकही तेथे आले व त्यांनी शिवीगाळ करून दगडफेक केली. यात नदीम सलीम शेख हा जखमी झाला.

## पांझरा नदीपात्रात ६० फूट उंचीच्या श्रीराममंदीराची उभारणी :अनुप अग्रवाल

**धुळे । लक्ष महाराष्ट्र वृत्त**




अयोध्येत उभारल्या गेलेल्या प्रभु श्रीरामांच्या मंदीराची प्रतिकृती धुळे शहरातील पांझरा नदीपात्रात कालिकादेवी मंदीराजवळ उभारली जात आहे. पत्रकार परिषद घेवून सविस्तर माहिती दिली. भाजपा धुळे शहर विधानसभा क्षेत्रप्रमुख अनुप अग्रवाल हे आपल्या पक्षाचे नाव व पद न लावता केवळ एक हिंदु श्रीरामभक्त म्हणून या मंदीराची उभारणी करीत आहेत.

२१ जानेवारीला या मुर्तीची आग्रा रोडवरील छत्रपती शिवरायांच्या मंदीरापासून अयोध्याधामपर्यंत वाजतगाजत मिरवणूक काढण्यात येणार आहे. त्यानंतर २२ ते ३१ जानेवारीदरम्यान मंदीर दहा दिवस भाविकांना दर्शनासाठी खुले असेल. या दहा दिवसांदरम्यान दररोज सकाळ सायंकाळ महाआरतीसह सायंकाळी भजनसंध्या व विविध कार्यक्रम आयोजित केले आहेत. परिसरात यात्रेतील पाळणे लावले जात आहेत. आतषबाजीही केली जाणार आहे. यासाठी रेडीमेड फटाके न घेता बनवून घेतले जात आहेत. अयोध्येत २२ जानेवारीला उपस्थित राहून पुजाविधी करणारे पुरोहितांपैकी काही पुरोहितांच्या प्रमुख उपस्थितीत भव्य धर्मसभेने या कार्यक्रमांची सांगता होईल अशी सविस्तर माहिती अनुप अग्रवाल यांनी दिली.

## पालकमंत्री भुसेंकडून गोदा घाटाची पाहणी

**नाशिक । लक्ष महाराष्ट्र वृत्त**

शहराचे सौंदर्य असलेल्या गोदा घाटावर नाशिक जिल्हा पालकमंत्री दादाजी भुसे यांनी भेट देत स्वच्छतेचा आढावा घेतला. यावेळी सबंधित यंत्रणेला गोदा घाटावर असलेल्या पानवेली तातडीने काढण्याच्या सूचना केल्यात. मंत्री भुसे यांनी रामवाडी पुल येथील गोदा पार्क परिसरात पाहणी केली. तसेच स्मार्ट सिटी अंतर्गत करण्यात आलेल्या कामांची पाहणी यावेळी करण्यात आली.

२२ जानेवारी रोजी अयोध्येत श्री रामाची प्राण प्रतिष्ठा होत असून याच धर्तीवर नाशिक शहरातील गोदा घाट देखील सजवला जाणार आहे. २४ जानेवारी रोजी रामकुंड तसेच परिसरात भाविकांतर्फे विविध कार्यक्रमांचे आयोजन केले जाणार आहे. यावेळी भाविकांची गैरसोय होणार नाही यासाठी सर्वोतोपरी यंत्रणा राबविण्याच्या सूचना त्यांनी केल्यात. यावेळी शिवसेना जिल्हा प्रमुख अजय बोरस्ते, स्मार्ट सिटीचे अधिकारी, पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी स्मार्ट सिटीचे मुख्य कार्यकारी अधिकारी सुमंत मोरे, मनपा उपायुक्त श्रीकांत पवार, उपायुक्त विजयकुमार मुंडे हे उपस्थित होते.

## प्रत्येक जिल्ह्यात गायींसाठी चारा केंद्र उपलब्ध करून देणार : शेखर मुंदडा

**धुळे । लक्ष महाराष्ट्र वृत्त**



महा एनजीओ फेडरेशनच्या माध्यमातून आमच्याशी संलग्न असलेल्या २५०० संस्थांचा सर्वांगीण विकास व महिला सक्षमीकरणासाठी आम्ही कटिबद्ध आहोत. महा एनजीओ फेडरेशन या समाजसेवी संस्थांच्या परिवाराचा एक घटक म्हणून कार्य करीत आहे, ही माझ्यासाठी अत्यंत आनंदाची बाब आहे. तसेच लवकरच प्रत्येक जिल्ह्यात गायींसाठी चारा केंद्रही उपलब्ध करून देणार असून धुळे शहरात ज्या सामाजिक संस्थांना पुरस्कार प्रदान करण्यात आले ते कोणाच्याही रेफरेन्सने नाही तर त्यांच्या कॅपबिलिटीने देण्यात आल्याची माहिती महा एनजीओ फेडरेशनचे संस्थापक शेखर मुंदडा यांनी पत्रकार परिषदेत दिली.

गो संरक्षण, गोशाळा, गोरक्षक, गोपालक, गोमाय मुल्यवर्धन आणि गो आधारित शेती तसेच संस्थांचे स्वावलंबन, गोवंश संस्कृतीची पुनर्स्थापना, गाईवर आधारित विकास, गाईवर आधारित शेती, आरोग्य व पर्यावरण बाबत जनजागृती, गायीचे संगोपन, याबाबत विविध कायदे करण्याबाबत विस्तार पूर्वक कार्य करणार आहोत. महाराष्ट्र गोसेवा आयोग लवकरच टोल फ्री नंबर घोषित करणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

# शहर पोलीस आयुक्तालयात ‘जम्बो’ फेरबदल

### आगामी लोकसभेच्या पार्श्वभूमीवर बदल्या

**नाशिक । लक्ष महाराष्ट्र वृत्त**

आगामी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर व निवडणूक आयोगाच्या आदेशानुसार, पोलिस आयुक्तांनी आयुक्तालयातील पोलिस ठाण्यांसह गुन्हे शाखा, वाहतूक शाखा, विशेष शाखेतील पोलिस निरीक्षकांच्या जम्बो बदल्या केल्या आहेत. स्थानिक व तीन वर्षे पुर्ण केलेल्या अधिकाऱ्यांच्या बदल्या करताना, कार्यकारी पदावरील अधिकाऱ्यांना अकार्यकारी पदावर नियुक्त केले आहे. यात २४ पोलीस निरीक्षकांसह २७ सहायक निरीक्षकांच्या बदल्या करण्यात आलेल्या आहेत.

लोकसभा निवडणुकीची पडघम वाजू लागले आहेत. जानेवारी अखेरीस वा फेब्रुवारीच्या पहिल्या आठवड्यात लोकसभा निवडणुकीची आचारसंहिता लागू होण्याची दाट शक्यता आहे. या पार्श्र्वभूमीवर निवडणूक आयोगाने विविध शासकीय विभागांमधील अधिकाऱ्यांच्या बदल्या किंवा जबाबदारीत बदल करण्याचे आदेश दिले आहेत. गेल्या आठवड्यात ग्रामीण पोलिस दलातील अधिकाऱ्यांच्याही परिक्षेत्रात बदल्या करण्यात आल्या आहेत. शहरातील २७ सहायक पोलिस निरीक्षकांच्याही जबाबदारीत बदल केले असून, यात मध्यवर्ती गुन्हे शाखेचे धर्मराज बांगर यांची वाचक शाखेत, नाशिकरोडचे हेमंत फड गुन्हे शाखेत, वाहतूकचे यतीन पाटील अंबड, गुन्हे शाखेचे किरण रौंदळ अंबड, प्रवीण सूर्यवंशी नाशिकरोडला तर वसंत खतेले, साजीद मन्सुरी व प्रमिला कावळे यांची गुन्हे शाखेत, भद्रकालीचे किशोर खांडवी वाहतूकमध्ये, गंगापूरचे नरेंद्र बैसाणे उपनगरला तर मुंबई नाक्याचे सोमनाथ गेंगजे यांची गंगापूर पोलिस ठाण्यात नियुक्ती केली आहे. बदली करण्यात आलेल्या अधिकार्यांना तात्काळ नियुक्तीच्या जागी हजर होण्याचेही आदेश आयुक्तांनी दिले आहेत.

# आजही दिवसाआड पाणी देणे शक्य : माजी आमदार अनिल गोटे

**धुळे । लक्ष महाराष्ट्र वृत्त**



सत्ताधाऱ्यांकडून पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सुटूच शकत नाही, कारण त्यांचा अभ्यास नाही. दुष्काळ पाण्याचा नाही, तर दुष्काळ इमानदारीचा आहे. गेल्या पाच वर्षात शेकडो कोटी रुपये खर्चूनही धुळेकरांच्या नळाला आठ-दहा दिवस पाणी येत नाही; वस्तुस्थिती आहे. आजही आहे त्या पाण्यात दिवसाआड पाणी देता येऊ शकते. एकेकाळी धुळेकरांसाठी संजीवनी ठरलेला एक्सप्रेस कॅनोल आज झाडाझुडूपांनी व्यापला आहे. मनपाच्या अक्षम्य दुर्लक्षामुळे धुळेकर जनतेचे पाण्यावाचून हाल होत असल्याचा आरोप माजी आमदार अनिल गोटे यांनी आज प्रसारमाध्यमांशी बोलताना केला.

माजी आ.अनिल गोटे यांनी आज सकाळी प्रसारमाध्यमांच्या प्रतिनिधींसाठी एक्सप्रेस कॅनोलचा पहाणी दौरा आयोजित केला होता. सुरवातीला त्यांनी गुलमोहर शासकीय विश्रामगृहात प्रसारमाध्यमांशी संवाद साधला. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी त्यांनी शहरातील पाणीप्रश्नावरुन सत्ताधार्यांवर टिका करतानाच उपाययोजना देखील सांगीतल्या. ते म्हणाले की, सत्ताधार्यांनी कोट्यवधी रुपये खर्चूनही शहराचा पाणी प्रश्न सुटलेला नाही, हे दुदैव आहे. अक्कलपाडा पाणी पुरवठा योजनेत ६० टक्के तर नियोजनात ५० टक्के दोष आहेत. ते दुर झाल्यास धुळेकरांना दोन दिवसाआड पाणी मिळू शकते. मी कोणाच्या विकास कामात अडथळा आणत नाही. मात्र, सर्वांच्या एकत्रित प्रयत्नांनी पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सोडविता येईल, अन्यथा नाही. मात्र, या कॅनोलकडे मनपाने दुर्लक्ष केल्याने कॅनोल झाडा-झुडूपांनी व्यापला आहे. एक्सप्रेस कॅनोलचा वापर थांबल्याने २४ वर्षानंतर नकाणे तलाव पुन:श्च एकदा कोरडा पडला आहे. आजमितीस जामखेडी, मालनगाव, पांझरा व अक्कलपाडा धरणांत पाण्याचा साठा असुनही मनपाच्या अक्षम्य दुर्लक्षामुळे धुळेकर जनतेचे पाण्यावाचून हाल होत आहेत. याप्रसंगी लोकसंग्रामचे कार्यकर्ते अविनाश लोकरे, विजय वाघ, अकबर अली सैय्यद, संजय पिंगळे, डॉ. सोमनाथ चौधरी, अनिल चौधरी, प्रशांत भदाने, प्रकाश महानोर, मयुर खैरनार आदी उपस्थित होते.



## एक पाऊल पुढे..!

काँग्रेसच्या 'भारत जोडो'यात्रेचा दुसरा टप्पा 'न्याय यात्रा'द्वारे सुरु झाला आहे. यात सहभागी होण्याचे आवाहन काँग्रेसने आघाडीतील घटक पक्षांना केले आहे. 'काँग्रेसची ताकद वाढविणारा उपक्रम' या दृष्टीने घटक पक्षांनी पाहिल्यास भाजपविरोधात एकत्र लढण्याची भूमिका स्वप्नरंजन ठरेल.

विरोधी पक्षांच्या 'इंडिया'आघाडीच्या अध्यक्षपदासाठी काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांच्या नावावर एकमत झाले आहे. त्याआधी, भाजपविरोधात एकत्र लढण्यावर विरोधकांचे तत्त्वतः एकमत होऊन इंडिया आघाडीचा जन्म झाला. म्हणजे, आतापर्यंत किमान दोन मुद्द्यांवर मतैक्य दिसते! काँग्रेसची न्याय यात्रा सुरु झाली, मात्र इंडिया आघाडीची यात्रा मुंगीच्या पावलांनीच पुढे सरकताना दिसत आहे. 'इंडिया'च्या ज्या बैठकीत जबाबदारीसंदर्भात काही ठरले ती प्रत्यक्ष नव्हती, आभासी पद्धतीने ती झाली. त्यातही ममता बॅनर्जी, अखिलेश यादव आणि उद्धव ठाकरे हे तीन नेते नव्हते. जागा वाटपाबद्दल आघाडीच्या घटक पक्षांमध्ये कमालीचे मतभेद आहेत. पश्चिम बंगालमध्ये काँग्रेसला केवळ दोन जागा सोडायची ममता यांची तयारी आहे. काँग्रेसला अर्थातच ममतांचा प्रस्ताव मान्य होणारा नाही. पश्चिम बंगालमध्ये ममतांचे सरकार अडचणीत कसे येईल, हे पाहण्याची एकही संधी केंद्रातील भाजप सरकार सोडत नाही. पश्चिम बंगालमध्ये राष्ट्रपती राजवट लागू करण्याची मागणी भाजपच्या राज्य शाखेकडून अधूनमधून होत असते. तीच मागणी काँग्रेसचे लोकसभेतील गटनेते अधीररंजन चौधरी यांनी केल्याने ममता बॅनर्जी दुखावल्या गेल्या आहेत. नाराज असल्यानेच त्यांनी इंडिया आघाडीच्या आभासी बैठकीकडे पाठ फिरविल्याचे सांगितले जाते. ममता असोत किंवा बिहारचे मुख्यमंत्री नितीशकुमार, यापैकी कोणालाही पंतप्रधानपदाची महत्त्वाकांक्षा लपविता आलेली नाही. त्यांनी आपल्या 'स्वप्ना'चा भलेही उच्चार केला नसला, तरी त्यांची पावले त्यादृष्टीने पडत आहेत.

यामध्ये आघाडीत अपेक्षित असलेला एकोपा निर्माण होण्यात अडथळे येतील हे पुरेपूर ठाऊक असतानाही ही मंडळी शह-प्रतिशहाचा खेळ थांबवू इच्छित नाहीत. खर्गे यांचे नाव पुढे येणे, याच खेळाचा भाग! नितीशकुमार यांनी इंडिया आघाडीसाठी सुरुवातीपासून पुढाकार घेतला. आघाडीची पहिली बैठक पाटण्यात झाली. आघाडीचे निमंत्रक, संयोजक वा मुख्य नेते म्हणून त्यांच्याकडेच पाहिले जात होते. जेव्हा ममता, अरविंद केजरीवाल यांनी आघाडीचा पंतप्रधानपदाचा चेहरा म्हणून खर्गे यांचे नाव पुढे आणले त्यावेळी अस्वस्थता वाढली. मुळात पंतप्रधानपदासाठी आपले नाव पुढे येऊ देणे खर्गे यांच्यासाठीच गैरसोयीचे; पण राहुल किंवा गांधी घराण्यातील कोणी पंतप्रधानपदासाठी नकोत, हे ममतांना अप्रत्यक्ष सुचवायचे होते. खर्गे यांनी धोरणीपणाने सावध भूमिका घेतली. खर्गे यांचे नाव अनपेक्षितपणे पुढे आणल्याने नितीशकुमार नाराज झाले, मात्र त्यांनी नंतर खुलासा करीत आपण कोणत्याही पदासाठी इच्छुक नसल्याचे म्हटले आहे. तरीही आघाडीचे संयोजकपद घेण्यास ते तयार नाहीत, हे बोलके म्हणावे लागेल. इंडिया आघाडीच्या बैठकीत संयुक्त जनता दलाचे राष्ट्रीय सरचिटणीस संजयकुमार झा यांनी आघाडीचे संयोजक म्हणून त्यांच्या नावाचा प्रस्ताव मांडला, त्याला नितीशकुमार यांनी होकार दिलेला नाही. त्यांच्या भूमिकेमुळे काँग्रेसकडे नेतृत्व देण्याशिवाय घटक पक्षांसमोर पर्याय नव्हता, ही वस्तुस्थिती. नेतृत्व करणार्या काँग्रेसला उत्तर प्रदेश, पश्चिम बंगाल आणि बिहारमध्ये एक आकडी जागा स्वीकारण्याशिवाय दुसरा मार्ग नाही, हे देखील वास्तव. शिवाय, अध्यक्षपद खर्गे यांनी स्वीकारल्यावर ते पंतप्रधानपदाचे उमेदवार नाहीत, हे सुद्धा स्पष्ट आहे. ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी १९७७ च्या निवडणुकीचा दाखला दिला आहे. 'निवडणुकीनंतर आम्ही नेता निवडू शकतो, १९७७ मध्ये मोरारजी देसाई यांचे नाव पंतप्रधानपदाचे उमेदवार म्हणून पुढे केले नव्हते' असे पवार यांनी म्हटले आहे. भाजप सरकारने विरोधी पक्षांच्या खासदारांवर निलंबनाची कारवाई केली. त्यानंतर भाजपविरुद्ध सर्व मतभेद बाजूला ठेवून एकत्र येण्याची निकड विरोधकांना भासेल, ही अपेक्षा होती. तसे चित्र अद्याप नाही. २८ पैकी केवळ १० पक्षांचेच नेते आघाडीच्या बैठकीला उपस्थित राहतात, यात सकारात्मक संदेश काय आहे? याचे चिंतन विरोधकांना करावे लागेल.

# मोदी यांची संकल्पना; नवी मुंबई विमानतळ

**भगीरथाने गंगा स्वर्गातून पृथ्वीवर आणली म्हणून त्याचे महत्त्व आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना या दृष्टीने विकासाची गंगा आणली म्हणून आधुनिक भगीरथ म्हणावे लागेल. केंद्रीय नागरी वाहतूक मंत्री ज्योतिरादित्य शिंदे यांनी रविवारी मुंबईत एक महत्त्वपूर्ण घोषणा केली असून, त्यांनी सांगितले की, पुढील वर्षी पनवेलच्या जवळचा नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ साकार होत आहे. १८ हजार कोटी रुपये खर्चाचा हा प्रकल्प असून, त्याच्या पहिला व दुसरा टप्प्याच्या कामास ३१ मार्च २०२५ रोजी सुरुवात केली जाईल.**



प्रकल्पाचे सर्व पाच टप्पे कार्यान्वित झाल्यावर ९ कोटी प्रवाशांच्या विमान वाहतुकीस सुरुवात होईल आणि नवी मुंबई हे शहर आंतरराष्ट्रीय जगाशी जोडले जाईल. पुढील वर्षी दोन टप्प्यांच्या कामाला एकदम सुरुवात होईल, असेही शिंदे यांनी सांगितले आहे. मुंबई, नवी मुंबई आणि पुणे या शहरांच्या एकूण परिसराला यामुळे नवीन झळाळी मिळणार असून, हा परिसर भविष्यात मिनी अमेरिका म्हणून ओळखला जाईल. मुंबईच्या टर्मिनलची जागा तेथे रोज उड्डाण करीत असलेल्या विमानांची संख्या पाहता कमी पडत आहे. अनेकदा तर असे होते की, लाईन क्लिअर मिळत नसल्याने मुंबईकडे येणाऱ्या विमानांना बराच वेळ आकाशात घिरट्या घालत राहावे लागते. आता तसे होणार नाही आणि नवी मुंबई विमानतळ झाल्यावर कोणत्याही विमानाला थांबावे लागणार नाही. आंतरराष्ट्रीय विमातळामुळे नवी मुंबई शहर अनेक आंतरराष्ट्रीय शहरांशी जोडले जाणार आहे, त्यामुळे या भागाचा कायापालट तर होणारच आहे, पण नवी मुंबईत व्यावसायिक संधी आणि प्रचंड गतीने विकास साकारला जाणार आहे. पंतप्रधान मोदी यांची एक योजना गती - शक्ती ही संकल्पना आहे आणि त्यानुसारच हा विमानतळ साकारला जाणार आहे. आंतरराष्ट्रीय प्रवासी येणार असल्याने गुंतवणुकीला प्रचंड संधी आणि रोजगार निर्माण होणार आहेत. खरे तर हे अगोदरच व्हायला हवे होते, पण पनवेल आणि नवी मुंबई परिसरात काही स्थानिक पक्ष असे आहेत की ज्यांचा प्रत्येक विकास प्रकल्पाला विरोध असतो. कोणताही प्रकल्प येणार असला की मोर्चे काढायचे, आमच्या प्रेतावरून जावे लागेल, अशी आगखाऊ भाषणे करायची आणि प्रकल्प येऊ द्यायचा नाही, असे राजकारण हे सातत्याने स्थानिक राजकीय पक्ष खेळत असत. पण कंत्राटे याच पक्षांचे पुढारी हडपत असत.

नवी मुंबई विमानतळ हा अगोदर रेवसला होणार होता. तेथे जागाही आहे, पण या राजकीय पक्षांनी अशीच धमकावणीची भाषा केली आणि तो प्रकल्प बारगळला. अर्थात तेव्हा देशात काँग्रेसचे नतद्रष्ट सरकार होते. त्यालाही अशा प्रकारे विकास नकोच होता. त्याला काँग्रेस सरकार हमखास बळी पडायचे आणि हे प्रकल्प प्रत्यक्षात कधीच आले नाहीत. अलिबाग आणि रेवस परिसरातील तरुण अजूनही रोजगारावाचून खितपत पडले आहेत. तसे नवी मुंबई विमानतळाबाबत घडले नाही, कारण आता केंद्रात मोदी यांचे मजबूत सरकार आहे. त्यांचा विकासाचा दृष्टिकोन सर्व परिचित आहे आणि विशेष म्हणजे मोदी यांचा विकासाचा दृष्टिकोन जनतेला पटलाही आहे आणि भावलाही आहे. त्यामुळे आता कुणी कितीही धमकावणीची भाषा केली, तरीही जनताच त्यांना महत्त्व देणार नाही.

नवी मुंबई विमानतळ तयार होऊन पूर्ण क्षमतेने कार्यान्वित झाल्यावर आंतरराष्ट्रीय शहरे एकमेकांना जोडली जाणार आहेतच सोबतच या परिसराचा कसा कायापालट होणार आहे याची कल्पना येण्यासाठी हा विमानतळ एकदा कार्यान्वित झाला की, कुठूनही कुठेही जाण्यासाठी सर्व प्रवासाच्या सुविधा उपलब्ध असतील. अटल सेतू असेल, बेलापूर ते तळोजा मेट्रो असेल, मुंबईत तर ठिकठिकाणी मेट्रो कार्यान्वित झाल्या असतील आणि बस वाहतूक तर असेलच. असा सर्व प्रकारे वाहतुकीनी परिपूर्ण असा हा भाग असेल. ज्या सरकारने वाहतुकीच्या सुविधांचे महत्त्व ओळखले त्या सरकारला नागरिकांचा पाठिंबा असतोच. हे विमानतळ सर्व मार्गांना जोडलेले असेल. ज्यात सायन-पनवेल हायवे आहे, अटल सेतू तारघर येथून जोडलेला असेल आणि वाहतुकीचे जाळे असेल. आधुनिकीकरणाची हीच तर व्याख्या आहे. असा आधुनिक आणि परिवहन सुविधांनी संपूर्ण असा हा परिसर येत्या काही वर्षांत साकारला जाणार आहे.

पंतप्रधान मोदी यांच्या राजवटीत परिवहन सुविधांचे जाळे तयार केले जाईल आणि त्याच वेळेस विरार - अलिबाग कॉरिडॉर ही मार्गिकाही विकसित केली जाणार आहे. सारा परिसर आधुनिक सुविधांनी उपयुक्त असा साकारला जाणार असून, त्यामुळे किती रोजगार निर्मिती केली जाणार आहे याची तर कल्पनाही न केलेली बरी. अलिबागसारखे शहरही मुंबईला जोडले जाणार आहे. केवळ एक खंत रायगडवासीयांना आहे आणि ती म्हणजे मुंबई - गोवा महामार्ग प्रकल्प अजूनही पूर्णपणे सुधारलेला नाही. काही तरी अगम्य कारणामुळे या प्रकल्पाचे काम रखडले ते रखडलेलेच आहे. कधी कंत्राटदार पळून गेला, तर कधी साहित्यच मिळाले नाही, म्हणून हा प्रकल्प आज कितीतरी वर्षे रखडलेला आहे. त्याचे काम पूर्णगतीने सुरू झाले तर पनवेल आणि कोकणलाही जोडले जाईल. रस्ते हे भावी पंचवीस वर्षांतील वाहनांच्या संख्येच्या अंदाजावरून तयार करायचे असतात, पण असे नियोजन याच मार्गाच्या बाबतीत केले गेले नाही, असे दुर्दैवाने म्हणावे लागते.

विमानतळ साकारला जात असतानाच अर्थव्यवस्थेच्या शेवटच्या पायरीवर असलेल्या माणसाला त्याचा लाभ मिळणेही आवश्यक आहे. त्याचा विचार करणेही अनिवार्य आहे. अन्यथा त्या विकासात सामान्य माणसासाठी उपयुक्त न ठरल्याचे गालबोट लागते. तसे होऊ नये आणि विकासाचा हा प्रचंड ओघ अनुभवत असतानाही सामान्य माणसालाही या प्रक्रियेत सामील करून घेणे आवश्यक आहे. याची काळजी पंतप्रधान नरेंद्र मोदी घेतीलच, त्यात काही शंका नाही. या दृष्टीने मोदी यांना आधुनिक भगीरथ म्हणावे लागेल.

# महाराष्ट्रात पहाटेस खेळ चाले...



महाराष्ट्र राज्याचे वैभव टिकविण्यासाठी राज्यातील नागरिक जागे असताना त्यांच्या समक्ष खेळ चालले पाहिजेत तरच राज्यातील तरुणाईला प्रेरणा मिळेल. नागरिक पहाटेच्या साखर झोपेत असताना पहाटेचे खेळ केल्यास राज्यातील तरुण मंडळी काय बोध घेणार. राज्यात पहाटेचे गुपचूप खेळ चालले तर त्याचा आपल्या देशातील लोकशाही प्रणालीवर विपरीत परिणाम होईल. तेव्हा देशातील लोकशाही टिकविण्यासाठी खुलेआम दिवसाढवळ्या खेळ झाले पाहिजेत. त्याची पूर्व कल्पना राज्यातील नागरिकांना असणे आवश्यक आहे. नागरिकांच्या करमणुकीसाठी विविध करमणुकीची साधने सध्या उपलब्ध आहेत. त्यात दिवसाचा खेळ चाले आणि रात्रीस खेळ चाले यामुळे लोकांची करमणूक होऊ लागली. 'रात्रीस खेळ चाले' या मालिकेचा विचार करता या मालिकेने प्रेक्षकांचे खूप भरभरून मनोरंजन केले आहे.

२५ जून, २०१६ रोजी भारतीय राज्य घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपली राजकीय भूमिका ठरविलेल्या, महत्त्वपूर्ण सभा आयोजित करण्यापासून ते नंतरच्या काळात, त्यांच्या शिकवणुकीभोवती मोठ्या चळवळीचे प्रतीक बनण्यापर्यंत, ज्या भवनाने इतिहासातील अनेक महत्त्वपूर्ण प्रसंग पाहिले आहेत, ती दादर येथील ऐतिहासिक प्रिंटिंग प्रेस व डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवनाची वास्तू पहाटेच्या वेळी जमीनदोस्त करण्यात आली. यातून नेमके आपण काय साध्य केले? जरी नोटीस दिली असली तरी आंबेडकरी जनतेला विश्वासात घेऊन योग्य ती कारवाई केली असती तर त्यांना रस्त्यावर उतरण्याची वेळ आली नसती. २३ नोव्हेंबर, २०१९ रोजी राजभवनावर पहाटे जाऊन मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांचा शपथविधी झाल्यानंतर 'पहाटेस खेळ चाले' हे वाक्य जास्त चर्चेला येऊ लागले.


आजही हे वाक्य काढल्यावर लोक पोट धरून हसतात. शेवटी हा राजकीय प्रश्न असला तरी असा पहाटेस खेळ चालू झाल्याने अनेकांना आश्चर्याचा धक्का बसला. यात आपलेच जास्त नुकसान होत असते, याचा विचार होणे आवश्यक आहे. महत्त्वाची बाब म्हणजे येथे राज्यातील सर्वसाधारण जनतेचा विचार केलेला दिसत नाही. तेव्हा असा पहाटेस खेळ चाले याचा गांभीर्याने विचार करून असे प्रकार जनतेच्या गाढ झोपेत होऊ नयेत याची काळजी लोकप्रतिनिधींनी घेणे गरजेचे आहे. कारण जनतेनेच आपल्याला निवडून दिले आहे, तेव्हा त्यांच्या साक्षीनेच शपथविधी पार पडला पाहिजे. त्याची अनेक कारणे असतील. यात शासनाचे फार मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान होते, हे विसरून चालणार नाही. अशा शासकीय समारंभाला राज्यातील प्रत्येक नागरिकांचा एक रुपया खर्च होत असतो. याचे भान लोकप्रतिनिधींनी ठेवायला हवे. आजही रेल्वेने प्रवास करीत असताना पहाटेस खेळ चाले याची चर्चा ऐकायला मिळते. यातून भावी नेते काय प्रेरणा घेणार? हा खरा प्रश्न आहे.

हल्ली तर काही ठिकाणी पहाटेच्या वेळी घरावर छापेमारीही करण्यात येते. मात्र पुढे काय होते याचे उत्तर अनुत्तरीत पाहायला मिळते. अशा घटनांचा शेवट काय झाला हे देशातील सामान्यातील सामान्य नागरिकांना समजले पाहिजे, तरच खऱ्या अर्थाने देशातील भ्रष्टाचाराला आळा बसेल. इतकेच नव्हे तर कोणत्याही प्रकारची पूर्वसूचना न देता अचानकपणे पहाटे ईमेल पाठवून बदलीचे आदेश देण्यात येतात. ते सुद्धा तत्काळ आपल्याला दिलेल्या पदाचा कारभार स्वीकारा. म्हणजे ही लोकशाहीला धोक्याची घंटा आहे.

सध्या मुंबईमध्ये काही ठिकाणी अतिक्रमण हटवण्याची कामे सुरू आहेत. मागील आठवड्यात सांताक्रूझ पूर्वेकडील पदपथावरील स्टॉल व दुकानासमोरील वाढविलेले छप्पर खाकी वर्दीच्या बंदोबस्तात जमीनदोस्त करण्यात येत होते. तशी आजूबाजूला गर्दीही भरपूर होती. बाजूच्या एका दुकानदाराला मी विचारले, सकाळी इतके छप्पर व स्टॉल जमीनदोस्त करण्यात आले. मग केव्हापासून त्यांचे काम चालू झाले? दुकानदार म्हणाले की, भल्या पहाटेपासून काम चालू आहे. दोन दिवसांनी पुन्हा स्टॉल त्याच ठिकाणी उभे असलेले दिसले. मग सांगा, जमीनदोस्त करून काय फायदा? मात्र अशा जागेवर स्टॉल कसे काय उभे राहतात? त्याचप्रमाणे दुकानाची छप्परं कोणाच्या आशीर्वादाने पुढे येतात. याचे उत्तर शोधावे लागेल. प्रत्येक विभागात असलेल्या स्टॉलच्या नोंदी झाल्या पाहिजेत. त्याचप्रमाणे नव्याने जे स्टॉल उभारले जातील त्याचीही नोंद झाली पाहिजे. जर एखाद्या जागेवर अतिक्रमण होत असेल तर तातडीने त्याच्यावर कायदेशीरपणे कारवाई होणे आवश्यक आहे. म्हणजे पहाटे कारवाई करण्याची वेळ येणार नाही. यात शासनाचे तसेच संबधित व्यक्तीचे नुकसान होत असते. त्यासाठी विभागातील संबंधित अधिकारी त्याचप्रमाणे लोकप्रतिनिधींनी प्रामाणिकपणे काम केले पाहिजे. मात्र मोकळ्या जागेवर अतिक्रमण होतातच कसे? अशावेळी शासकीय यंत्रणा काय करीत असते, याचा विचार होणे आवश्यक आहे.

तेव्हा प्रत्येकांनी पारदर्शक काम केल्यास अतिक्रमण हटविण्याची वेळ येणार नाही. यात खासगी तसेच शासकीय मालमत्तेची हानी होते. अतिक्रमण हटविण्याच्या वेळी ठाण्याच्या आयुक्तांनाही आपली दोन बोटे गमवावी लागली होती. तेव्हा राज्याच्या विकासाच्या दृष्टिकोनातून पहाटेस खेळ चाले बंद होणे गरजेचे आहे. सत्ताधारी सरकारला राज्यातील नागरिकांना विश्वासात घेऊन काम करावे लागेल. तेव्हा राज्याच्या हिताच्या दृष्टिकोनातून शासकीय कारभार पारदर्शक चालला पाहिजे, तोही कार्यालयीन वेळेत, पहाटेच्या वेळेस नव्हे.

## शब्दकोडे-२९५



**आडवे शब्द**

१. 'स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे आणि तो मी मिळविणारच' असे सांगणारा नेता १०. विषमाच्या विरुद्ध १२. केस काळे करण्याचे साधन १३. गाणे गाणारा १४. पर्ण १५. लग्नातील नवरा मुलगा १७. मळलेला २०. नूतन २१. पाताळात भोगाव्या लागणाऱ्या वेदना २५. जमीनजुमला २७. शिर्डीचे संत २९. गंध ३०. शारीरिक श्रम, अंगमेहनत ३३. सदोदित ३४. सासरच्या विरुद्ध ३५. भाकरीचे एक धान्य ३६. पंकज ३७. टिंगल ३८. हिंदीत जवळ, इंग्रजीत उत्तीर्ण ३९. कौशल्य ४१. रेशमाचे जाडसर कापड ४२. रखवालदार ४४. तात्पर्य ४५. चांदणी ४७. भेग, चीर ४८. रांग, दर्शनासाठी ओळ ४९. पातक ५०. द्वाड, खोडकर (हिंदी) ५३. बेशुद्ध, चैतन्यहीन ५५. किंचित कडू चव ५६. उत्सवाचे दिवस ५७. भारवाहक ५८. रंग ६१. लहान पोर ६३. सुट्टीचा दिवस ६६. हसू येण्याजोगे ६८. रथ चालविणारा ६९. अधिक श्रेष्ठ, वरचढ ७०. नेता ७१. पांढऱ्या टोपीचे गवत ७२. नवे कोरे ७३. तीव्र ऊन ७४. पोत्याचे कापड

**उभे शब्द**

१. स्वेटरचा उबदार धागा २. मनाचा ओढा ३. मोजणी ४. एक तिखटमिठाची वडी ५. मियांची नकली वेणी ६. धेनु, गोमाता ७. धडधड ८. पुरुषांच्या कपाळावरील चंदनाचा ठिपका ९. ललाट १०. उंच सखल नसलेले ११. अंत:करण १६. अरण्यवास १७. मज्जाव, बंदी १८. गुरांचे खाद्य १९. तांदूळ २२. पुष्कळ २३. त्याप्रमाणे २४. महाडचे सुप्रसिद्ध तळे २५. अखबार २६. बाज विणण्याचे कापडी पट्टी २८. मूर्ख ३०. काम, कार्य ३१. लहानसहान ३२. '--- मे हड्डी' एक म्हण ३३. किरकोळ सामान ३५. पावा ३६. मकबरा थडगे ३८. पवित्र ४०. माळ, हार ४३. विपुलता ४५. संतापी ४६. लोखंड घासण्याचे एक हत्यार ४९. शेराचा चौथा भाग ५१. ताणलेल्या दोरीचा आवाज ५२. मावा ५३. आवस, पौर्णिमेच्या विरुद्ध ५४. आश्चर्य ५९. दीपक ६०. निवड न करता एकच ६१. भाताची पानातील सुबक वाढ ६२. घागरा ६४. दुधाचे दही बनविणारे ६५. अखंडता ६६. सोने ६७. प्रतिस्पर्धी ६८. मलई ६९. अव्याहत ७०. मुलाची मुलगी ७१. थंड

## शब्दकोडे-२९४ चे उत्तर

**आडवे उत्तर**

१.मृत्युंजय ४.लाभदायक ७.अवास्तव १०.यमन १२.पसायदान १४.मज १५.रसभरीत १८.कावा १९.वहिवाट २१.नरम २२.सदाचार २३.तीन २४.नानकटाई २५.कलम २७.परवा २८.मेषपात्र ३०.जसा भाव तसा ३२.डमरु ३३.भरीत ३४.मलमल ३६.अवसान ३८.पार ३९.दमणी ४१.जनन ४२.सट ४२अ.कोटर ४४.बायको ४५.गरा ४६.विना ४८.दार ४९.रजनीनाथ ५०.कापूर ५१.तुलसीदास ५४.वार्ता ५५.कलह ५६.नमन ५७.करकरीत ५९.नीरज ६१.पावा ६२.डमडम ६४.वसा ६७.कडकडाट ६८.कदम ६९.रसरशीत

**उभे उत्तर**

१.मृग २.जय ३.यम ५.भरभर ६.कप ७.अदाकार ८.वानवा ९.वर्तमानपत्र ११.नर १३.साम दाम दंड भेद १४.महिना १६.सनई १७.रीम १९अ.वानवसा २०.टक २२.सल २५.कवायत २६.पौष २७.परतपरत २८.मेरुमणी २९.पालम ३१.वर्ज्य ३५.लघुकोन ३६.अजगर ३७.वनराज ३८.पाट ४०.मस्त ४२.सनाथ ४३.टक्कर ४४.बारदान ४६.विनायक ४७.अतुलनीय ४८.दासी ५२.लहर ५३.समस्त ५४.वातड ५७.कवाड ५८.कडक ६०.जवस ६१.पाक ६३.मद ६५.सार ६६.खंत

हे मराठी दैनिक मालक **विजय आत्माराम ठाकरे** यांनी मुद्रक-प्रकाशक-संपादक- चंद्रशेखर आत्माराम पाटील यांच्या पार्वती प्रिंटर्स-२, ई ११५/३, एम.आय.डी.सी., अवधान, धुळे (एम-५) येथे छापून, लक्ष महाराष्ट्र कार्यालय, बॉम्बे लॉज बिल्डींग, पहिला मजला, आग्रारोड धुळे येथून प्रकाशित केले.
**'लक्ष महाराष्ट्र' नाशिक कार्यालय** - फ्लॅट नं.१०, गंगा अपार्टमेंट, बोहरा पार्क, गंगापूर रोड, नाशिक-४२२००२ **मध्यवर्ती कार्यालय-** बॉम्बे लॉज बिल्डींग, दौलत म्युझिक सेंटरच्यावरती, पहिला मजला, आग्रारोड, धुळे. मो.९६६४३२५५५५ फोन नं. ०२५६२-३५६५७४.
**नंदुरबार कार्यालय** - शॉप नं. ११/१२, संत दगा महाराज कॉम्प्लेक्स, कोरीट नाका, नंदुरबार. **जळगाव कार्यालय** - बी विंग, रुम नं. ११ तिसरा मजला, गोलाणी मार्केट, जळगाव. E-mail: lakshamaha.dhule@gmail.com. (RNI No.MAHMAR/2019/79184)

**न्यूज कॉलम**


### कांदा निर्यातबंदीवर शेतकरी आक्रमक

**नाशिक ।** शमकरसंक्रांतीच्या मुहूर्तावर तालुक्यातील विठेवाडी व झिरेपिंपळ शिवारातील शेकडो कांदा उत्पादक शेतकऱ्यांनी केंद्र व राज्य शासनाच्या शेतकरी विरोधी चुकीच्या धोरणाचा सामुदायिक रोष व्यक्त केला. 'ज्यांनी केली वारंवार शेतीमालाची निर्यातबंदी, त्यांनाच आता मतदानबंदी' अशाप्रकारे घोषणाबाजी करत तशा आशयाचा फलक विठेवाडी येथील चौफुलीवर लावून निषेध व्यक्त केला.

### खैर तस्करांविरोधात गुन्हा दाखल

**नाशिक ।** सुरगाणा तालुक्यातील उंबरठाण वनपरिक्षेत्रात वनकर्मचाऱ्यांनी पाठलाग करत मांधा येथे खैर लाकडे असलेले चारचाकी वाहन (डीएन ०९ जी ०९५०) पकडले. या वाहनात खैराचे १७ नग आढळले. वनविभागाला मिळालेल्या माहितीनुसार वनअधिकाऱ्यांनी उंबरठाण वनपाल व वनरक्षकांची टीम तयार केली. त्यांनी मांधा येथे संशयित वाहनाचा पाठलाग करत असताना चालक रस्त्याच्या बाजूला वाहन सोडून जंगलात फरार झाला. वाहनात ०.८ घनमीटर लाकूड मिळाले असून त्याची किंमत १३ हजार ७९९ रुपये व ३ लाख ९० रुपयांची चारचाकी वाहन असा एकूण ४ लाख ३ हजार ७९९ रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.

# वंचितच्या पदाधिकाऱ्यांनी संपूर्ण ताकदीने लोकसभा निवडणुकीच्या तयारीस लागावे






### जिल्हा व महानगर पदाधिकाऱ्यांच्या बैठकीत रणनीती तयार

**नविन नाशिक । लक्ष महाराष्ट्र वृत्त**

आगामी लोकसभा निवडणुकीत इंडिया आघाडीच्या मित्रपक्षांबरोबर युतीची बोलणी सुरू आहे. त्यात समाधानकारक तोडगा निघण्याची वाट न बघता आपली ताकद दाखवून घेण्यासाठी वंचित बहुजन आघाडीच्या कार्यकर्त्यांनी सज्ज राहण्याचा निर्धार पक्षाच्या जिल्हा व महानगर पदाधिकाऱ्यांच्या बैठकीत व्यक्त करण्यात आला. अध्यक्षस्थानी जिल्हाध्यक्ष पवन पवार होते.

आगामी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर नाशिक, दिंडोरी आणि धुळे मतदार संघाबाबत रणनीती आखण्यासाठी शालिमार चौकातील आयएमए हॉलमध्ये आयोजित जिल्हा व महानगर पदाधिकाऱ्यांची बैठक आयोजित करण्यात आली होती. वंचित बहुजन आघाडीने स्वबळावर लढावे व आपली ताकद दाखवून द्यावी, सक्षम उमेदवार द्यावेत, बूथ रचना सक्षम करावी, बाळासाहेब आंबेडकर व ज्येष्ठ नेत्यांचे जास्तीत-जास्त प्रचार दौरे आयोजित करावेत आदी महत्वपूर्ण सूचना यावेळी पदाधिकाऱ्यांनी केल्या. नाशिक महानगर तसेच जिल्ह्यात पक्षाची शंभर टक्के बूथ रचना पूर्ण झाली आहे. कार्यकर्ते व पदाधिकाऱ्यांनी जोर लावल्यास नाशिक, दिंडोरी आणि धुळे आपण सहज काबीज करू शकतो. सर्व मतदारसंघात वातावरण निर्मिती करण्यासाठी पदाधिकाऱ्यांचे दौरे आयोजित केले जातील, असे महानगराध्यक्ष अविनाश शिंदे यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणात सांगितले. पक्षाने कुणालाही उमेदवारी दिली तरी त्याच्या विजयासाठी आपण आपले सर्वस्व पणास लावू, असेही शिंदे पुढे म्हणाले.

कर्मवीर दादासाहेब गायकवाड हे नाशकातून निवडून आले होते. त्यामुळे नाशिक हा वंचित बहुजन आघाडीचा बालेकिल्ला आहे. ही जागा आम्ही ताकदीने लढून विजयाला गवसणी घालणारच असा ठाम विश्वास जिल्हाध्यक्ष पवन पवार यांनी अध्यक्षीय भाषण करताना व्यक्त केला. कार्यकर्त्यांनी आपली ताकद दाखवून देण्यासाठी कंबर कसावी दिंडोरी आणि धुळे मतदारसंघही आपण सहज काबीज करू शकतो, असेही पवार आपल्या भाषणात पुढे म्हणाले. नवनियुक्त पदाधिकारी नितीन मोहिते यांच्यावर जिल्हा उपाध्यक्षपदाची जबाबदारी यावेळी सोपविण्यात आली. उत्तर महाराष्ट्र महासचिव वामनदादा गायकवाड, महिला जिल्हाध्यक्ष उर्मिला गायकवाड आदींची यावेळी भाषणे झाली. बैठकीस युवक प्रदेश सदस्य चेतन गांगुर्डे युवक महानगरप्रमुख रवी पगारे, महानगर महासचिव संजय साबळे, संदीप काकळीज, बजरंग शिंदे, दीपचंद दोंदे, बाळासाहेब शिंदे, विश्वनाथ भालेराव, विवेक तांबे, संजय दोंदे, दामोदर पगारे, सुनील साळवे, दीपक पगारे, पंडित नेटावते, अनिल आठवले, विलास गुंजाळ राजेंद्र गवारे, भरत भालेराव यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. वंचित बहुजन आघाडीचे युवा नेते सध्या बाळासाहेब आंबेडकर यांचे पुत्र सुजात आंबेडकर यांचा वाढदिवस असल्या कारणाने संयुक्तरीत्या केक कापण्यात आला. शहरातील सिविल हॉस्पिटलसह काही ठिकाणी खाण्याचे पदार्थ तसेच फळे वाटण्यात आली.

# वृत्तपत्र समन्वयक शैलेंद्र साळी यांना उत्कृष्ट पत्रकारिता पुरस्कार प्रदान



**नाशिक । लक्ष महाराष्ट्र वृत्त**

श्री कालिका देवी मंदिर संस्था, नाशिक व कै. कृष्णाराव पाटील कोठावळे ट्रस्ट यांच्या वतीने देण्यात येणारा उत्कृष्ट उत्तर महाराष्ट्र पत्रकारिता पुरस्कार सन्मान संपादक तसेच लेखक सुरेश भटेवरा यांच्या हस्ते दैनिक लोकनामाचे छायाचित्रकार शैलेंद्र साळी यांना प्रदान करण्यात आला.

शैलेंद्र साळी यांनी नाशिक जिल्ह्यात गेल्या ४० वर्षापासून अनेक स्थानिक वर्तमानपत्रात काम केले आहे. तसेच नाशिक जिल्ह्यातील अनेक संस्थांचे प्रसिद्धी प्रमुखपदीही काम करत आहेत. त्याचबरोबर दैनिक लोकनामा या वर्तमानपत्राचे ते छायाचित्रकार म्हणून कार्यरत आहेत. तसेच नाशिक शहरात होणाऱ्या विविध राज्य स्पर्धा व सांस्कृतिक कार्यक्रमास ते आवर्जून उपस्थित असतात.

बातम्या, पत्रकार परिषदेचे नियोजन करणे, फोटो काढून नाशिक शहरातील सर्व दैनिकांना देण्याचे काम ते करतात. शैलेंद्र साळी यांना नुकतेच कालिका मंदिर येथे गौरविण्यात आले आहे. यावेळी व्यासपीठावर केशवराव पाटील, सुभाष तळाजीया, अशोक दुधारे, डॉ. प्रताप कोठावळे यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. पुरस्कार मिळाल्याबद्दल शैलेंद्र साळवे यांचे विविध स्तरावरून अभिनंदन करण्यात येत आहे.

# नाशिकला परीट-धोबी समाजाचा राज्यस्तरीय वधू-वर पालक परिचय मेळावा २१ जानेवारीला

**नाशिक । लक्ष महाराष्ट्र वृत्त**

नाशिक जिल्हा महाराष्ट्र परीट-धोबी सेवा मंडळाच्या वतीने येत्या २१ जानेवारीला नाशिकमधील मु.श. औरंगाबादकर प. सा. नाट्यगृह येथे राज्यस्तरीय वधू -वर पालक परिचय मेळावा होत असून त्याची जय्यत तयारी सुरु असल्याची माहिती जिल्हाध्यक्ष विजय शिरसाठ यांनी दिली.

महाराष्ट्र परीट-धोबी सेवा मंडळाच्या नाशिक जिल्ह्या शाखेच्या वतीने दरवर्षी या मेळाव्याचे आयोजन करण्यात येते. मंडळाचे प्रदेशाध्यक्ष राजेंद्र खैरनार यांच्या व राज्यातील समाजातील मान्यवरांच्या प्रमुख उपस्थित हा मेळावा होणार असून मेळाव्याची शहरात आणि जिल्ह्यात जय्यत तयारी सुरु आहे.

पूर्वतयारी बैठक संपन्न झाली या बैठकीस जिल्हा जिल्हाध्यक्ष विजय शिरसाठ, महेश गवळी, नाना गवळी, सुभाष मोरे, रामदास गायकवाड, कैलास देवरे, वसंत जाधव, दगू राऊत, सुरेखा सगर, विष्णू पवार, सुरेखा मोरे आदी उपस्थित होते. अशी माहिती शैलेंद्र साळी यांनी पत्रकारद्वारे दिली.

# सकल मराठा समाजाचा आरक्षणासाठी गावोगावी,घरोघरी होतोय प्रचार



**धुळे । लक्ष महाराष्ट्र वृत्त**

मुंबई येथे होणाऱ्या मराठा समाज आरक्षणासाठी संघर्ष योध्दा मनोज जरांगे पाटील यांच्या नेतृत्वात २० जानेवारी रोजी होणार्या आमरण उपोषणासाठी धुळे जिल्ह्यातून मोठ्या प्रमाणात समाज बांधव सहभागी होणार आहेत. अनेक वाहनांसह तसेच बैलगाडी रिक्षा, ट्रॅक्टर यांच्यासह पायी जाणार आहेत. त्यासाठी धुळ्यात जेलरोड येथे सुरु असलेल्या सकल मराठा समाजाच्या आंदोलन स्थळी कोअर कमीटी सदस्यांनी नियोजन चालविले आहे.१५ दिवस पुरेल एव्हढा अन्नधान्याचा साठा, पिण्याचे पाणी, आवश्यक लागणारी औषध साधन साम्रग्री आदींची जुळवा जुळव करण्यात येत असून विविध समित्यांचे गठण करण्यात आले असून जबाबदारी सोपविण्यात आली आहे.

धुळे जिल्ह्यात शिरपूर,शिंदखेडा दोंडाईचा, साक्री धुळे ग्रामिण मालेगाव तालुक्यातील झोडगे पंचक्रोशीतील तसेच जळगाव जिल्ह्याला लागून असलेल्या धुळे जिल्ह्यातील गावांमधील समाज बांधंवापर्यंत सकल मराठा समाजाच्यावतीने ज्येष्ठ सदस्य सुधाकर बेंद्रे, साहेबराव देसाई, विनोद जगताप, सुनिल पाटील-देशमुख, राजेंद्र काळे, अशोक सुडके, प्रल्हाद मराठे, वामन मोहिते, दै.आपलं नवराज्यचे संपादक, धुळे जिल्हा मराठी पत्रकार संघाचे माजी अध्यक्ष सुनिल पाटील, कैलास वाघारे, प्रमोद साळूंखे, अंबर मराठे, संदीप चव्हाण,सुनिल ठाणगे, मनोज ढवळे, आदींसह समाज बांधव संपूर्ण जिल्हा पिंजून काढत आहे. धुळे महानगरमधील विविध भागात देखील मराठा समाजाला आरक्षण मिळावे म्हणून मशाल रॅलीचे ठिकठिकाणी आयोजन करण्यात येत आहे. माजी नगरसेवक संदीप पाटोळे,भैय्या शिंदे, विकास बाबर, श्रीरंग जाधव, भानुदास बगदे, माजी नगरसेवक तुषार पाटील हे प्रचार करीत आहेत.

# निमझरी पटेल अनुदानित आश्रमशाळेत श्री बालाजी सेवा समितीतर्फे लेडीज विंग मार्फत समुपदेशन




**धुळे । लक्ष महाराष्ट्र वृत्त**

तालुक्यातील निमझरी येथे आर.सी.पटेल अनुदानित आश्रमशाळेत किशोरवयीन मुलामुलींसाठी श्री बालाजी सेवा समिती शिरपूरच्या लेडीज विंग मार्फत समुपदेशन करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बालाजी सेवा समिती शिरपूरच्या डायरेक्टर कक्कूबेन पटेल होत्या. तसेच बालाजी सेवा समिती सदस्य सौ. रिटा पटेल, शिरपूर एज्युकेशन सोसायटी सल्लागार सौ. रेषा पटेल, धुळे जिल्हा माहेश्वरी महिला समाज मंडळ सह सेक्रेटरी सौ. मीनाक्षी राठी, ॲड. सौ. शालिनी सोनवणे हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते.

सर्वप्रथम स्व. मम्मीजी यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली. यानंतर शिरपूर येथील प्रसिद्ध विधी तज्ञ सौ शालिनी सोनवणे यांनी किशोरवयीन मुलामुलींसाठी लैंगिक अत्याचार, शोषण व कायदेविषयक माहिती दिली. गुड टच - बॅड टच या संकल्पना मुलांना व मुलींना समजावून दिल्या. एखाद्या मुलावर किंवा मुलीवर काही लैंगिक अत्याचार होत असेल तर आपण कुणाकडे कशी दाद मागावी ? तक्रार कोणाकडे करावी ? याबद्दल माहिती देण्यात आली. तसेच शाळा, घर किंवा प्रवासात बाहेर अशा ठिकाणी यासारख्या घटना घडल्यास त्याबद्दल आपण नि:संकोचपणे पोलिसांकडे किंवा महिला तक्रार समितीकडे माहिती द्यावी असे त्यांनी मार्गदर्शन केले.

सौ.रिटा पटेल व सौ.रेषा पटेल यांनीही मुलींशी सुसंवाद साधला. यावेळी प्राचार्य पी.डी.पावरा, प्राथमिक मुख्याध्यापक पी.एन.लोहार, शिक्षिका सौ.एम.बी.पाटील, अधीक्षक एस.व्ही.ठाकरे, अधीक्षिका श्रीमती एस.जे.पावरा उपस्थित होते. शिक्षक पी.आय.बडगुजर यांनी सूत्रसंचालन करुन आभार मानले.

## भाजप दिव्यांग विकास आघाडीतर्फे बालगोपाळांना पतंग वाटप

**नविन नाशिक ।** भारतीय जनता पार्टी दिव्यांग विकास आघाडीच्या वतीने स्वामी विवेकानंदनगर येथे बालगोपाळांना पतंग वाटप करण्यात आले. यावेळी न्यू विकलांग बहुउद्देशीय संस्थेच्या अध्यक्षा यमुना घुगे, भाजपा दिव्यांग विकास आघाडीचे जिल्हा उपाध्यक्ष व क्रांती सेनेचे प्रदेश अध्यक्ष बाळासाहेब घुगे, ओबीसी मोर्चाचे शहर उपाध्यक्ष दिलीप देवांग, दिव्यांग आघाडीचे मंडल अध्यक्ष सुरज वाजे, सिमा मोरे, पुष्पा वाजे, आरती खैरनार यांच्यासह दिव्यांग बांधव उपस्थित होते.



# श्रीगजानन महाराज सेवा संस्थेतर्फे आदर्श समाज भूषण पुरस्काराचे शुक्रवारी वितरण

**नाशिक । लक्ष महाराष्ट्र वृत्त**

**गेल्या २३-२४ वर्षापासून नाशिक शहरामध्ये धार्मिक, सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रात नि:स्वार्थ कार्य करणारी अग्रगण्य ठरलेली श्री गजानन महाराज सेवा संस्था ही होय. या संस्थेच्या वतीने सन २०११ पासून सामाजिक, शैक्षणिक, कृषी, क्रीडा, आरोग्य, वैज्ञानिक, कला, औषध संशोधन, सहासीवीर तसेच ग्रामीण भागात लोकाभिमुख उपक्रम राबवणाऱ्या व्यक्तींचा आदर्श समाज भूषण पुरस्काराने सन्मान केला जात आहे.**

यावर्षी म्हणजे सन २०२४ चे आदर्श समाज भूषण पुरस्कारार्थी - नाशिक शहरातील ख्यातनाम अस्थिरोग तज्ज्ञ डॉ. विजय काकतकर, अग्निहोत्री क्षेत्रातील बाळासाहेब आंबेकर, दिव्यांग साठी (दृष्टिहीन) कार्यरत असणारे अरुण भारस्कर - अध्यक्ष द ब्लाईण्ड वेल्फेअर ऑर्गनायझेशन, सायकलिंग सह सामाजिक उपक्रमात योगदान देणारे गणेश लोहार व त्यांचे दोन्ही पुत्र (पितापुत्र), नाशिक अन्न सेवा समिती-अल्पदरात डायलिसिस उपलब्ध करून देणारे रामावतारजी चड्ढा, सामाजिक कार्यकर्ता (कल्याण) सदाशिव चव्हाण, अमृतवाहिनी इन्स्टिट्यूट संगमनेरचे प्राचार्य डॉ. मनोज शिरभाते तसेच भारतीय महिला नाशिक ते नासा अपूर्वा जाखडी यांना देण्यात येत आहे. यंदाच्या पुरस्काराचे





वितरण नाशिक विभागाचे धर्मदाय उपायुक्त एम.एल.जोगी, व हभप विवेकबुवा गोखले (नरसिंहवाडी) यांच्या हस्ते शुक्रवार, दि. १९ जानेवारी रोजी संध्याकाळी ६ वाजता श्री शंकराचार्य न्यास सभागृह गंगापूर रोड नाशिक येथे होणार आहे. या पुरस्कार वितरण समारंभानंतर विवेक बुवा गोखले यांचे श्री गजानन महाराज व समकालीन संत या विषयावर प्रवचन होणार आहे. तसेच, मंगळवार दि.१६ जानेवारी रोजी कै. सुधाताई बेळे यांच्या स्मृती प्रित्यर्थ रवींद्र पैठणे यांचा सत्कार, श्री.अक्कलकोट स्वामी महाराज व त्यांच्या अलौकिक लीला या विषयावर, बुधवार, दि. १७ जानेवारी रोजी कै. शरदराव कुलकर्णी यांच्या स्मृती प्रित्यर्थ सचिदानंद सद्गुरू साईनाथ महाराज या विषयावर विवेक गोखले यांचे प्रवचन आयोजित करण्यात आलेले आहे.

तरी या कार्यक्रमाचा व प्रवचन मालिकेचा सर्व भाविकांनी, ज्येष्ठ नागरिक व महिलांनी लाभ घ्यावा असे संस्थेच्या वतीने आवाहन करण्यात आलेले आहे अशी माहिती शैलेंद्र साळी यांनी दिली.


प्रोसेस जमा — **ॲड. दिनेश एम. कोळी**

**निशाणी क्र.-६**

## जाहीर नोटीस

**साक्री येथिल मे. दिवाणी न्यायाधीश सो. क. स्तर यांचे कोर्टात**

**दि. कि. अ. नं. ६८/२०२४**

श्री. प्रकाश भिमराव सुर्यवंशी वगैरे .....अर्जदार

विरुध्द

कोणीही नाही ......सामनेवाला

मयत - कै. भगा जागो पाटील (सुर्यवंशी) ( मुत्य दि. दि.१६/११/२००८)

ज्या अर्थी वरील अर्जदार यांनी बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट (VIII ) बॉम्बे १८२७ चे कलम ८ अन्वये वारस दाखला (हेअरशीप सर्टीफिकेट) मिळण्यासाठी मे. दिवाणी न्यायालय क स्तर कोर्टात दाखल केला आहे तसेच इतर कोणाचा वारस हक्क असल्यास त्यांना सदर जाहीर नोटीस काढण्यात आली आहे. मयताला मुत्युसमयी खालीलप्रमाणे वारस होते १) श्री प्रकाश भिमराव सुर्यवंशी, नातु २) श्री. मधुकर भगा सुर्यवंशी, मुलगा ३) सुभद्राबाई भिमराव सुर्यवंशी, सून

ज्या अर्थी या जाहिर नोटीसीदवारे कळविण्यात येते की मयत - कै. भगा जागो पाटील सुर्यवंशी यांच्या निधनानतर त्याचे कायदेशीर वारस घोषित होऊन मिळण्यासाठी मौजे दुसाणे, ता. साक्री, जि.धुळे सि.स.नं. ७६० मिळकतीवर वारस लावण्याकामी वारस दाखला आवश्यक असल्याने वरील वारसा व्यतीरीक्त कोणाचा काहीही हक्क व अधीकार असल्यास त्यांनी साक्री येथील मा. दिवाणी न्यायाधीश क. स्तर यांच्या न्यायालयात दि. १७.०२.२०२४ रोजी सकाळी १० वाजता स्वत: अगर वकीलामार्फत हजर राहावे वरीलप्रमाणे करण्यास चुकल्यात तर आपल्या अर्जाच्या कामी कोणत्याही प्रकारचे काहीएक हरकत नाही असे समजुन योग्य तो आदेश पारीत करण्यात येईल.

सदर जाहिर नोटीस मे. न्यायालयाच्या सही शिक्यानिशी प्रसिध्दीत दिली आहे.

स्थळ- साक्री
दि.१२.०१.२०२४

(शिक्का)

**कामगिरी कारकुन** — **अधिक्षक**
**दिवाणी न्यायलय क. स्तर साक्री** — **दिवाणी न्यायलय क. स्तर साक्री**



**निशाणी क्र.-६**

## जाहीर नोटीस

**धुळे येथिल मा. दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर सो. यांचे कोर्टात**

**कि. दि. अर्ज नं. ०१/२०२४**

१) श्री. राजेंद्र झिंगा कुंवर, उ. वय - ५७ वर्षे, कामधंदा - मजुरी, राह- मु. धनुर, पो. कापडणे, ता. जि. धुळे २) श्री. दिलीप झिंगा कुंवर, उ. वय - ५६ वर्षे, कामधंदा- मजुरी, राह- नवागाम, दिंडोली, सुरत जि. सुरत (गुजरात) ३) श्रीमती शोभाबाई झिंगा कुंवर उ. वय - ६३ वर्षे, कामधंदा - घरकाम, (४) श्रीमती प्रतिभा झिंगा कुंवर, उ. वय - ५० वर्षे, कामधंदा- घरकाम. नं. ३ व ४ राह. मु. धनुर, पो. कापडणे, ता. जि. धुळे .....अर्जदार

।। विरुध्द ।।

कोणी नाही .....सामनेवाला

कमलबाई झिंगा कुंवर (मृत्यु दिनांक २५/०५/२०२३)

राह- मौजे धनुर, ता. जि. धुळे .....मयत

ज्याअर्थी, अर्जदार नं. १ ते ४ यांनी मयत कमलबाई झिंगा कुंवर यांचे निधन झालेले असल्यामुळे मयताचे मृत्यूनंतर स्थावर मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे- तु. जि. धुळे पो. तु. ता. धुळे पैकी मौजे धनुर ग्रामपंचायत हद्दीतील मालमत्ता क्र. ७०, त्यासी क्षेत्रफळ - ४० x ८ = ३२० चौ. फुट असून कच्चे मातीचे बांधीव घर आहे. त्यासी चतु:सिमा रेकॉर्ड ऑफ राईटप्रमाणे आहेत.

उक्त नमुद स्थावर मिळकतीसाठी वारस असल्याचा पुरावा म्हणून वारस प्रमाणपत्र (Succession Certificate) मिळण्यासाठी मा. दिवाणी न्यायाधीश क. स्तर सो. धुळे यांचे न्यायालयात वारस सर्टीफिकेट आणि वारस डिक्लरेशन होणेसाठी बॉम्बे रेग्युलेशन्स ॲक्टच्या तरतुदींप्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

तरी त्याबाबत. अर्जदार नं. १ ते ३ मधील वारखांचे व्यतिरीक्त इतर कोणीही वारस असल्यास अथवा कोणाचीही कोणत्याही प्रकारची तक्रार, लेखी हरकत असल्यास त्यांनी धुळे येथील मा. सह दिवाणी न्यायाधीश क्र. स्तर सो. धुळे यांचे न्यायालयात दि. १२/०२/२०२४ रोजी ठीक सकाळी १०:३० वाजता स्वतः अगर आपल्या वकीलांमार्फत हजर राहून लेखी हरकत / खुलासा करावा. अन्यथा प्रस्तुत अर्जास कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास सदरहू अर्जावर अर्जदार हिचे लाभात आदेश करण्यात येईल.

सदरची जाहिर नोटीस कोर्टाच्या सहीशिक्यानिशी प्रसिध्दीस दिली असे.

धुळे
दि.०५/०१/२०२४ — आदेशावरुन

(शिक्का)

**कामगिरी कारकुन** — **अधिक्षक**
**दिवाणी न्यायलय क. स्तर सो.धुळे** — **दिवाणी न्यायलय क. स्तर सो.धुळे**

**न्यूज कॉलम**

### क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले जयंती साजरी

**शिरपूर ।** तालुक्यातील वरुळ येथे आर.सी.पटेल इंग्लिश मीडियम स्कूल मध्ये क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. मुख्याध्यापिका सपना मराठे यांनी सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करत अभिवादन केले. इयत्ता नर्सरी ते चौथीच्या मुलींनी भारतातील विविध क्षेत्रात प्रथम आपल्या कार्याच्या ठसा उमटवणाऱ्या महिलांची वेशभूषा सादर केली. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी योगदान दिले.

### गार वाऱ्यामुळे नाशिककरांना थंडीची अनुभूती

**नाशिक।** वातावरणातून गायब झालेला गारवा आता पुन्हा परतला आहे. दिवसा काही प्रमाणात ऊन लागत असले तरी सायंकाळनंतर गार वाऱ्यामुळे थंडीची अनुभूती नाशिककरांना येते आहे. गेल्या दोन दिवसांत किमान तापमानात साडे चार अंशांची घसरण झालेली असून किमान तापमान ११.१ अंश सेल्सिअस तर कमाल २९.३ अंश सेल्सिअस राहिले. यंदाच्या हंगामात नाशिकला अपेक्षेप्रमाणे थंडी जाणवलेली नाही. गेल्या काही दिवसांपासून वातावरणातून गारवा पूर्णपणे गायब झाला होता.

# आ.कुणाल पाटील यांच्याहस्ते चिंचवार ते सैताळे रस्त्याचे भूमीपुजन

### धुळे तालुक्यात विकासाची घोडदौड

**धुळे । लक्ष महाराष्ट्र वृत्त**



धुळे ग्रामीणचे आ.कुणाल पाटील यांच्या विशेष प्रयत्नाने धुळे तालुक्यातील रस्त्यांच्या कामांना गती देण्यात येत असून रस्ते कामासह विविध विकास कामांची घोडदौड सुरु आहे. त्याअनुषंगाने आ.कुणाल पाटील यांनी मंजुर केलेल्या चिंचवार ते सैताळे रस्त्याच्या कामाचे भूमीपुजन करण्यात आले. या कामासाठी एकूण १ कोटी ९१ लक्ष रुपयांचा निधी आ.पाटील यांनी मंजुर केला आहे.

याबाबत सविस्तर वृत्त असे कि, धुळे तालुक्यातील सिंचन बंधारे,बोरी-पांझरा नदीवर पुलांचे बांधकाम,रस्ते यांच्यासह धुळे ग्रामीण मतदारसंघातील प्रत्येक गावात विविध विकासाची कामे करुन तालुक्यात विकासाची घोडदौड आ.कुणाल पाटील यांच्या नेतृत्वाखाली सुरु आहे. धुळे तालुक्यातील चिंचवार ते सैताळे रस्त्याचे काम करण्यात यावे अशी मागणी येथील ग्रामस्थांनी केली होती. त्यानुसार सदर रस्त्याच्या कामासाठी आ.कुणाल पाटील यांनी एकूण १ कोटी ९१ लक्ष रुपयांचा निधी मंजुर करुन आणला आहे. त्याकरीता आ.पाटील यांनी वेळोवेळी पाठपुरावा केला होता. मुख्यमंत्री ग्राम सडक योजना टप्पा-२ अंतर्गत या रस्त्याचे काम होत आहे. या निधीतून सैताळे चिंचवार रस्त्याचे डांबरीकरण होणार असून आवश्यक त्या ठिकाणी पाईप मोर्यांचे बांधकाम केले जाणार आहे. सदर रस्त्याचे काम होत असल्याने सैताळे,चिंचवारसह परिसरातील रहिवाशी, शेतकरी, वाहनधारक यांची गैरसोय दूर होणार असल्याने समाधान व्यक्त केले आहे. या रस्त्याच्या कामाचा आ.कुणाल पाटील यांच्या हस्ते दि.१५ जानेवारी रोजी भूमीपुजन करण्यात आले. यावेळी कार्यक्रमाला बाजार समितीचे संचालक एन.डी. पाटील,कृषीभूषण भिका पाटील, सैताळे सरपंच गिरधर मोरे,माजी सरपंच सुनिल पाटील,चिंचवार माजी सरपंच सोमनाथ पाटील,रवि मराठे,लाकमानी उपसरपंच बाजीराव महाले,सैताळे पो.पाटील त्र्यंबक पाटील,जिभाऊ सखाराम पाटील,दिलीपसिंग गिरासे,माजी सरपंच भटू पाटील,भटू गिरासे, उपअभियंता व्ही.एम पाटील,सहा.अभियंता सुर्यवंशी, प्रदिप पाटील,पंडीत पाटील,प्रशांत पाकळे,कांतीलाल पाटील, बन्सीलाल पाटील, एकनाथ पाटील,शिवराम पाटील,मच्छिंद्र पाटील,प्रेम पाटील,योगेश पाटील,गोपी महाले,दत्ता नागापुरे,जगन्नाथ पाटील,सोपान पाटील यांच्यासह सैताळे,चिंचवार,लामकानी,वडणे,निकुंभे,शिरधाणे प्र.नेर येथील कार्यकर्ते,पदाधिकारी उपस्थित होते.

# साक्री तालुक्यातील चार गावात विकसित भारत संकल्प यात्रा संपन्न



### ग्रामस्थांना विविध योजनांची माहिती देऊन केली जनजागृती

**धुळे । लक्ष महाराष्ट्र वृत्त**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून विकसित भारत संकल्प यात्रेचे देशभरात आयोजन करण्यात येत आहे. या पार्श्र्वभूमीवर आज विकसित भारत संकल्प यात्रा साक्री तालुक्यातील ग्रामपंचायत मल्याचापाडा, मळगाव प्र.वार्सा, काळंबा व पानखेडा येथे उत्साहात संपन्न झाली.

विकसित भारत संकल्प यात्रेद्वारे केंद्र शासनाच्या योजना नागरिकांच्या दारापर्यंत पोहचविण्यात येत आहेत. धुळे जिल्ह्यात २९ नोव्हेंबर,२०२३ पासून सुरु झालेली ही यात्रा ८ जानेवारी,२०२४ पर्यंत धुळे-८२, साक्री-१५५, शिरपूर-८३ व शिंदखेडा-८३ अशा ४०३ ग्रामपंचायतीत पोहचली असून ४ लाख ५३ हजार ४९४ नागरिकांनी या यात्रेला आतापर्यंत भेट दिली आहे. या यात्रेत ग्रामीण भागात आयुष्मान भारत, प्रधानमंत्री गरीब कल्याण योजना, राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती अभियान, प्रधानमंत्री आवास योजना, उज्वला योजना, पीएम विश्र्वकर्मा योजना, प्रधानमंत्री किसान सन्मान योजना, किसान क्रेडीट कार्ड, प्रधानमंत्री पोषण अभियान, हर घर जल-जलजीवन मिशन, जन धन योजना, जीवन ज्योती विमा योजना, सुरक्षा विमा योजना, अटल पेन्शन योजना, नमो फर्टीलायझर या योजनांबाबत माहिती देण्यासोबत नागरिकांची आरोग्य तपासणीदेखील करण्यात येत आहे.

शेतकऱ्यांसाठी ड्रोन प्रात्यक्षिक आणि नैसर्गिक शेती व मृदा आरोग्य पत्रिकेवरील चर्चा ग्रामीण भागासाठी उपयुक्त ठरत आहे. स्थानिक पातळीवर यश संपादन केलेल्या महिला आणि खेळाडूंचा सत्कार हेदेखील या यात्रेचे वेगळे वैशिष्ट्य आहे. यात्रेदरम्यान आरोग्य शिबिराच्या माध्यमातून आरोग्य तपासणी आणि किसान क्रेडीट कार्ड नोंदणी करण्यात येत आहे. तसेच विकसित भारत संकल्प यात्रेत पात्र लाभार्थ्यांकडून विविध योजनेचे अर्ज भरुन घेण्यात येत आहे. या कार्यक्रमांत नागरिकांनी विकसित भारत संकल्पनेची शपथ नागरिकांना देण्यात आली.यावेळी मेरी कहानी मेरी जुबानी अंतर्गत लाभार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले. सुरुवातीला यात्रेचे स्वागत ग्रामपंचायत पदाधिकारी व ग्रामस्थांच्यावतीने स्वागत करण्यात आले. यावेळी सरपंच, ग्रामस्थ व लाभार्थी तसेच विविध विभागांचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# राज्यस्तरीय स्वामी विवेकानंद युवा प्रेरणा पुरस्काराने नरेंद्र कुवर सन्मानित



**जैताणे ।** युवकमित्र परिवार या संस्थेतर्फे राष्ट्रीय युवक दिनानिमित्त दिला जाणारा या वर्षीचा राज्यस्तरीय स्वामी विवेकानंद युवा प्रेरणा पुरस्कार-२०२४ हा ऑल इंडिया धनगर समाज महासंघ उत्तर महाराष्ट्र युवा आघाडी प्रमुख नरेंद्र कुवर नंदुरबार यांना माजी सनदी अधिकारी रंगनाथ नाईकडे, मा.ह.भ.प.प्रल्हाद महाराज डांगे(समाज प्रबोधन मंच आळंदी)व अविनाश निमसे(संस्थापक बुक क्लब, पुणे) यांच्या हस्ते पत्रकार भवन नवी पेठ पुणे येथे सन्मानित करण्यात आले. या पुरस्काराचे मानकरी मां. नरेंद्र कुवर यांचे संपूर्ण धनगर समाज जैताणे व वैदाने परिसरातून शुभेच्छांचा वर्षा होत आहे.



### लोकमान्य विद्यालयात राष्ट्रमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांची जयंती साजरी

**धुळे । धुळे शहरातील लोकमान्य माध्यमिक विद्यालय चितोड रोड येथे राष्ट्रमाता जिजाऊ आणि स्वामी विवेकानंद यांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी मुख्याध्यापिका संगीता कमलेश पाटील, शिक्षक, आणि शिक्षकेतर कर्मचारी वृंद उपस्थित होते.**

# शेतकऱ्यांच्या खात्यावर १७ कोटी ४२ लाख रुपयांचा पिकविमा ऑनलाईन जमा

### आ. पटेल, आ. पावरा, भूपेशभाई पटेल यांच्या पाठपुराव्याला यश





**शिरपूर । लक्ष महाराष्ट्र वृत्त**

महाराष्ट्र राज्याचे माजी शालेय शिक्षण, क्रीडा व युवक कल्याण मंत्री आमदार अमरिशभाई पटेल, आ. काशिरामदादा पावरा, भूपेशभाई पटेल यांच्या पाठपुराव्याने १ रुपये खरीप पिकविमा अंतर्गत ७४४५ लाभार्थी शेतकऱ्यांच्या खात्यावर मोठी रक्कम तसेच केळी पिकविमा धारक हजारो शेतकरी बांधवांच्या खात्यावर १७ कोटी ४२ लाख रुपयांचा पिकविमा ऑनलाईन जमा झाला असून लाभार्थी शेतकरी बांधवांनी आनंद व्यक्त केला आहे.

प्रियदर्शिनी सहकारी सूतगिरणीचे चेअरमन भूपेशभाई पटेल यांनी दहिवद गावापासून तालुक्यातील सर्वच गावांमध्ये, तसेच आदिवासी दुर्गम भागामध्ये वनपट्टेधारक शेतकरी बांधवांसाठी १ रुपये खरीप पिकविमा बाबत जनजागृती केली होती. त्यामुळे असंख्य शेतकरी बांधवांनी १ रुपये खरीप पिकविमा योजनेचा प्रत्यक्ष लाभ घेतला. या खरीप पिकविमा धारक शेतकरी बांधवांनी फक्त १ रुपये तर उर्वरित पिक विमा रक्कम राज्य व केंद्र शासनाने भरली. तसेच दुसरी योजना म्हणजे, पुनर्रचित हवामान आधारित केळी पिक विमा योजना अंतर्गत शिरपूर तालुक्यातील शिरपूर, बोराडी, अर्थे, जवखेडे, होळनांथे, थाळनेर, सांगवी या सात महसूल मंडळ (सर्कल) मध्ये १७ कोटी ४२ लाख रुपयांचा पिक विमा मंजूर झाला असून सर्वच सर्कलमधील सर्व शेतकऱ्यांच्या खात्यावर रक्कम जमा होत असल्याची माहिती जिल्हा कृषी अधिकारी श्री तडवी, शिरपूर तालुका कृषी अधिकारी श्री साठे व शिरपूर कृषी उत्पन्न बाजार समिती सभापती के.डी.पाटील यांनी दिली. यापूर्वी नोव्हेंबर २०२३ मध्ये जवखेडा व थाळनेर या फक्त दोन सर्कल मधील काही शेतकऱ्यांच्याच खात्यावर रक्कम जमा झाली होती. भाईंच्या प्रयत्नाने त्यांनी कृषी आयुक्त व कृषी खात्यात अनेक अधिकाऱ्यांकडे पाठपुरावा केल्याने आता सर्वच शेतकऱ्यांच्या खात्यावर ऑनलाईन जमा झाला होत आहे. बँक खात्यातील तांत्रिक अडचणीमुळे एखाद्या कोणीही शेतकऱ्याच्या खात्यावर रक्कम जमा झाली नाही तर त्यांनी तात्काळ कृषी खात्याशी किंवा आमदार कार्यालयाशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# जिल्ह्यातून मुंबई आंदोलनासाठी ७३ ट्रॅक्टर:९ वाहनांची आतापर्यंत नोंदणी

**धुळे । लक्ष महाराष्ट्र वृत्त**

मराठा समाजाला आरक्षण मिळावे यासाठी मनोज जरांगे पाटील यांच्या आवाहनानुसार मुंबईत २० जानेवारीपासून आंदोलन केले जाणार आहे. या आंदोलनात धुळे जिल्ह्यातून ७३ ट्रॅक्टर, ९ चारचाकी वाहनांची आतापर्यंत नोंदणी झाली आहे. तर प्रतिकात्मक २५ बैलगाड्या घेऊन जाणार आहे. मालेगाव व धुळे जिल्ह्यातून सुमारे ५०० वाहनांचे नियोजन करण्यात आले आहे.

सकल मराठा समाजाच्या कोर कमिटीचे सदस्य साहेबराव देसाई, विनोद जगताप, सुनील पाटील, संदीप पाटोळे, वीरेंद्र मोरे, कैलास वाघारे आदी प्रचार आणि प्रसाराच्या संदर्भामध्ये गेले असता त्या ठिकाणी ट्रॅक्टरचे नोंदणी सुरू असल्याचे स्थानिक पदाधिकाऱ्यांनी सांगितले. पायी जाणाऱ्या समाज बांधवांची भोजनाची नाश्त्याची निवासाची व्यवस्था देखील धुळे येथून निघणाऱ्या आणि मुंबईपर्यंत जाणाऱ्या महामार्गावर करण्यात येत आहेत. त्याची प्रत्यक्ष पाहणे करण्यासाठी सकर मराठा समाजाचे शिष्टमंडळ जागोजागी माहिती घेत आहेत. झोडगा येथून हजारो समाज बांधव पाटील समाज आणि मराठा पाटील हा सगळा मोठ्या प्रमाणावर सहभागी होणार असल्याचे देखील त्यांनी सांगितले.

# आदिवासी परिवर्तन मेळावा व नियोजन बैठक

**शिंदखेडा । लक्ष महाराष्ट्र वृत्त**



तालुक्यातील शिष्ट मंडळ यांनी आदिवासी विकास मंत्री विजयकुमार गावीत, खा.हिना गावीत यांच्याशी शिंदखेडा तालुक्यातील आदिवासी बांधव यांना आदिवासी विकास विभाग यांच्यामार्फत योजनाचे लाभ मिळावे अशी मागणी करण्यात आली. त्या मागणीचा विचार करून शिंदखेडा शहरात मेळावा संदर्भात बैठक आयोजित करण्यात आली होती.

यावेळी उपस्थित गुलाब सोनवणे, किशोर ठाकरे, रवी जाधव, मंसाराम मालचे, रवींद्र चव्हाण, विष्णू इशी, प्रकाश सोनवणे, युवराज पवार, लक्ष्मण ईशी, रामभाऊ गायकवाड, सतिलाल सोनवणे, रवींद्र ठाकरे, दादाभाऊ सोनवणे, दीपक पवार, ज्ञानेश्र्वर मोरे, वासुदेव ठाकरे, भाऊसाहेब मालचे, मच्छिंद्र शिंदे, रामनाथ धनगरी, कृष्णा मालचे, भगवान पिंपळे, अजय पवार, विजय ठाकरे, विजय मालचे, विष्णू फुल पगारे,गणेश पवार, विठ्ठल सोनवणे,राजू सोनवणे, आशिष पवार, भरत मोरे, बापू महाराज, ईश्र्वर सोनवणे, अजय पवार, पंकज फुले, शिवराम सोनवणे, जिभाऊ भवरे, अभिमन मालचे, गौतम सोनवणे, श्रयामसिंग सोनवणे, आप्पा सोनवणे, श्रयामभाऊ सोनवणे, महेंद्र भिल, शानाभाऊ सोनवणे, दीपक फुले, सुमित मालचे, भिका बोरसे व सर्व आदिवासी बांधव उपस्थित होते.

# राष्ट्रीय युवा महोत्सवात महाराष्ट्राला तीन पुरस्कार

**नाशिक । लक्ष महाराष्ट्र वृत्त**



पंचवटीतील हनुमान नगरातील महायुवाग्राममध्ये २७ व्या राष्ट्रीय युवा महोत्सवातातंर्गत आयोजित कार्यक्रमात केंद्रीय युवक कल्याण आणि क्रीडा विभागामार्फत देशसेवा तसेच समाजसेवा क्षेत्रात उत्कृष्ट कार्य करणाऱ्या युवकांना तसेच स्वयंसेवी संस्थांना राष्ट्रीय युवा पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. यावेळी २०२०-२१ वर्षांच्या पुरस्कारांचे वितरण केंद्रीय क्रीडा व युवक कल्याण राज्यमंत्री निसिथ प्रामाणिक यांच्या हस्ते करण्यात आले.

वैयक्तिक पुरस्काराचे स्वरुप एक लाख रुपये, सन्मानचिन्ह आणि प्रमाणपत्र तर युवक संस्थांच्या पुरस्काराचे स्वरुप तीन लाख रुपये, सन्मानचिन्ह आणि प्रमाणपत्र असे होते. पुरस्कार्थींमध्ये महाराष्ट्रातील वैष्णवी गोतमारे (अकोला), विधी पलसापुरे (लातूर) आणि संस्थात्मक पुरस्कारात शक्ती विकास बहुद्देशीय संस्था (नाशिक) यांचा समावेश आहे. यावेळी प्रामाणिक यांनी, भारताने आज सर्वच क्षेत्रात विकासाचे पाऊल पुढे टाकले असून भारताचा जगात प्रभाव निर्माण झाला असल्याचे सांगितले. देशाप्रती सेवाभाव असणाऱ्या आणि समाज सेवेसाठी उल्लेखनीय काम करणाऱ्या १५ युवक आणि दोन संस्थांचा राष्ट्रीय युवा पुरस्काराने सन्मानित केले जात असल्याचे त्यांनी नमूद केले. देशातील युवकांसाठी हा महोत्सव प्रेरणेचा स्त्रोत आहे.

# जयहिंद शाळेत विद्यार्थी व पालकांसाठी करीअर मार्गदर्शन वर्ग

### प्रा. डॉ. दिनेश भुताडा यांचे मार्गदर्शन

**धुळे। लक्ष महाराष्ट्र वृत्त**



शहरातील जयहिंद हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय येथे इयत्ता १० वी, ११ वी व १२ वी चे विद्यार्थी, पालक व शिक्षक यांच्यासाठी डॉ. विश्र्वनाथ कराड, एम. आय. टी. वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटी, पुणे व जयहिंद शिक्षण संस्था, धुळे यांच्या संयुक्त विद्यमाने करियर मार्गदर्शन वर्गाचे आयोजन दि. १५ जानेवारी रोजी करण्यात आले होते.

याप्रसंगी जयहिंद शिक्षण संस्थेचे संचालक ॲड. राजेन पाटील, एम. आय. टी. कॉलेज, पुणे येथील प्रा. डॉ. दिनेश भुताडा, प्रा.डॉ. पंकज धात्रक, प्रा. चेतन पाटील हे प्रमुख अतिथी होते. तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जयहिंद शिक्षण संस्थेचे संचालक मोहन मोरे हे होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीस समई प्रज्वलित करुन, संस्थेचे संस्थापक अध्यक्ष झेड्. बी. पाटील यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. विचारमंचावर मान्यवरांसह प्रभारी प्राचार्य शिवाजी बैसाणे, उपप्राचार्य प्रविण बोरसे, पर्यवेक्षक एस. डी. मोरे, व्ही. टी. गवळे उपस्थित होते.

संस्थेचे विद्यमान जेष्ठ संचालक ॲड. राजेन पाटील यांनी प्रमुख अतिथी प्रा. डॉ. दिनेश भुतडा यांचे स्वागत करुन, जयहिंद शिक्षण संस्थेचा परिचय देऊन, जयहिंद शिक्षण संस्थेच्या वतीने अतिथींचे ऋणनिर्देश व्यक्त केले. प्रमुख मार्गदर्शक तथा अतिथी प्रा. डॉ. दिनेश भुतडा यांनी जवळपास एक ते दिड तासात इयत्ता १० वी व १२ नंतरच्या विद्यार्थ्यांसाठी करियरच्या विविध वाटा याविषयी सखोल मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी आत्मनिर्भर होण्यासाठी काय केले पाहिजे हे सांगितले. वैद्यकीय क्षेत्रात करिअर साध्य करण्यासाठी भौतिकशास्त्र व गणित या विषयांना मुळीच विसरता कामा नये असे सांगितले. शेवटी आपल्या व्याख्यानाचा समारोप करतांना भावी करियर संदर्भातील विद्यार्थी, पालक, शिक्षक यांनी विचारलेल्या प्रश्र्नांना उत्तरे देऊन शंकांचे निरसन केले. अध्यक्षीय समारोप करताना जयहिंद शिक्षण संस्थेचे संचालक मोहन मोरे म्हणाले की, आपले विविध क्षेत्रातील आदर्श हे संघर्षातून जे यशस्वी झालेत तेच निवडले पाहिजेत. आपल्याला फुले-शाहू-आंबेडकर यांच्या विचारांचा वारसा आहे. म्हणून आपण परिश्रम व संघर्ष या माध्यमातून आपण निवडलेले ध्येय नक्की साधणार आहोत. असे मोरे म्हणाले.

सदर मार्गदर्शन वर्गाचे प्रास्ताविक, सूत्रसंचालन व आभारप्रदर्शन विद्यालयाचे पर्यवेक्षक व्ही. टी. गवळे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रभारी प्राचार्य एस. व्ही. बैसाणे, उपप्राचार्य प्रा. प्रविण बोरसे, पर्यवेक्षक एस. डी. मोरे, व्ही. टी. गवळे, प्रा. बिपीन सोनवणे, प्रा. डॉ. पंकज धात्रक, प्रा. चेतन पाटील, संजीव पावरा, किरण भामरे, यांनी परिश्रम घेतले. मार्गदर्शन वर्गास विद्यार्थी, शिक्षक, पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# विश्वकर्मा सन्मान योजनेची उद्या एक दिवसीय कार्यशाळा

**धुळे । लक्ष महाराष्ट्र वृत्त**

केंद्र शासनाच्या प्रधानमंत्री विश्र्वकर्मा सन्मान योजनेअंतर्गत १८ प्रकारच्या पारंपारिक कारागिरांना व्यवसाय प्रशिक्षण, आर्थिक मदत व प्रोत्साहन देण्यासाठी गुरुवार , १८ जानेवारी २०२४ रोजी सकाळी ११ वाजता जिल्हाधिकारी अभिनव गोयल यांच्या अध्यक्षतेखाली व सहायक निर्देशक (एमएसएमई) मुंबई प्रफुल उमरे यांच्या उपस्थितीत एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आली असल्याची माहिती जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी विजय चाटी यांनी एका शासकीय प्रसिद्धी पत्रकान्वये दिली आहे.

सुक्ष्म, लघु व मध्यम उद्यम मंत्रालय (एमएसएमई) मुंबई ( भारत सरकार) यांच्या मार्फत प्रधानमंत्री विश्र्वकर्मा कौशल्य सन्मान योजनेअंतर्गत १८ प्रकारच्या पारंपारिक कारागिरांना व्यवसायाठी व्यवसायाचे प्रशिक्षण, आर्थिक मदत व प्रोत्साहन देण्यासाठी ही कार्यशाळा जिल्हा नियोजन भवन, जिल्हाधिकारी कार्यालय, धुळे येथे आयोजित करण्यात आली आहे. असून या प्रशिक्षणास जिल्ह्यातील सर्व सरपंच व ग्रामसेवक, कारागिर यांनी उपस्थित रहावे असे आवाहन श्री. चाटी यांनी प्रसिद्धी पत्रकान्वये केले आहे.

दैनिक
# लक्ष महाराष्ट्र
धुळे-नंदुरबार-नाशिक
बुधवार दि. १७ जानेवारी २०२४





# कोट्यवधी खर्चूनही धुळेकर ‘कोरडे’!

## माजी आमदार अनिल गोटेंनी केली कॅनल, तलावाची पाहणी

























धुळे ।सत्ताधार्यांकडून पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सुटूच शकत नाही, कारण त्यांचा अभ्यास नाही. दुष्काळ पाण्याचा नाही, तर दुष्काळ इमानदारीचा आहे. गेल्या पाच वर्षात शेकडो कोटी रुपये खर्चूनही धुळेकरांच्या नळाला आठ-दहा दिवस पाणी येत नाही; वस्तुस्थिती आहे. आजही आहे त्या पाण्यात दिवसाआड पाणी देता येऊ शकते. एकेकाळी धुळेकरांसाठी संजीवनी ठरलेला एक्स्प्रेस कॅनोल आज झाडाझुडूपांनी व्यापला आहे. मनपाच्या अक्षम्य दुर्लक्षामुळे धुळेकर जनतेचे पाण्यावाचून हाल होत असल्याचा आरोप माजी आमदार अनिल गोटे यांनी आज प्रसारमाध्यमांशी बोलताना केला.  माजी आ.अनिल गोटे यांनी आज सकाळी प्रसारमाध्यमांच्या प्रतिनिधींसाठी एक्सप्रेस कॅनोलचा पहाणी दौरा आयोजित केला होता. सुरवातीला त्यांनी गुलमोहर शासकीय विश्रामगृहात प्रसारमाध्यमांशी संवाद साधला. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी त्यांनी शहरातील पाणीप्रश्नावरुन सत्ताधार्यांवर टिका करतानाच उपाययोजना देखील सांगीतल्या. ते म्हणाले की, सत्ताधार्यांनी कोट्यवधी रुपये खर्चूनही शहराचा पाणी प्रश्न सुटलेला नाही, हे दुदैव आहे. अक्कलपाडा पाणी पुरवठा योजनेत ६० टक्के तर नियोजनात ५० टक्के दोष आहेत. ते दुर झाल्यास धुळेकरांना दोन दिवसाआड पाणी मिळू शकते. मी कोणाच्या विकास कामात अडथळा आणत नाही. मात्र, सर्वांच्या एकत्रित प्रयत्नांनी पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सोडविता येईल, अन्यथा नाही. यावेळी श्री.गोटे यांनी कॅनोलची प्रत्यक्ष पहाणी करताना त्याच्या झालेल्या दशेची माहिती दिली. तसेच वेळीच उपाययोजना न केल्यास भविष्यात निर्माण होणार्या संकटाचीही जाणीव करुन दिली. याप्रसंगी लोकसंग्रामचे कार्यकर्ते अविनाश लोकरे, विजय वाघ, अकबर अली सैय्यद, संजय पिंगळे, आबीद मणियार, बाबू शेठ, डॉ. सोमनाथ चौधरी, अनिल चौधरी, दिपक जाधव, प्रशांत भदाने, प्रकाश महानोर, मयुर खैरनार आदी उपस्थित होते.

संकलन : दिपक वाघ

CMYK

दैनिक

# लक्ष महाराष्ट्र

धुळे-नंदुरबार-नाशिक






# धुळे शहराच्या सर्वांगीण विकासासाठी केंद्र सरकारचा मोठ्या प्रमाणात निधी मंजूर

## खासदार डॉ. सुभाष भामरे यांचे प्रतिपादन


























धुळे ।

धुळे शहराच्या सर्वांगीण विकासासाठी केंद्र सरकारच्या माध्यमातून अनेक योजनांसाठी निधी मंजूर झाला असून या निधीतून सिंचन, रस्ते, भूयारी गटारीची कामे प्रगतीत असल्याचे प्रतिपादन खासदार डॉ.सुभाष भामरे यांनी विकसित भारत संकल्प यात्रेच्या शुभारंभ प्रसंगी केले. विकसित भारत संकल्प यात्रेच्या शहरी भागातील दुसऱ्या टप्प्याचा शुभारंभ खासदार डॉ. सुभाष भामरे यांच्या उपस्थितीत दत्तमंदिर परिसरात आज झाला. यावेळी ते बोलत होते. या कार्यक्रमास जिल्हा परिषदेच्या अध्यक्षा धरती देवरे, विकसित भारत संकल्प यात्रेचे नोडल ऑफिसर तथा मुंबई बंदर प्राधिकरणाचे उपाध्यक्ष आदेश तितरमारे, जिल्हाधिकारी अभिनव गोयल, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी शुभम गुप्ता, महापालिका आयुक्त अमिता दगडे-पाटील, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी चंद्रकांत पवार, अतिरिक्त आयुक्त करुणा डहाळे, उपायुक्त संगिता नांदुरकर, पल्लवी शिरसाठ, उपमुख्य कार्यकारी अधिकारी गणेश मोरे, तहसिलदार (संजय गाधी) श्री.पाटील, प्रकल्प अधिकारी प्रमोद पाटील, माजी महापौर जयश्री अहिरराव, माजी नगरसेवक अनिल नागमोते, भारती माळी, हिरामण अप्पा गवळी आदी उपस्थित होते. खासदार डॉ.सुभाष भामरे म्हणाले की, धुळे शहराच्या सर्वांगिण विकासासाठी केंद्र सरकारच्या माध्यमातून अनेक योजनांसाठी अमृत १ व अमृत २ मध्ये निधी मंजूर झाल्याने शहरातील अनेक महत्वाचे प्रश्न यातुन सोडविले जात आहे. धुळे शहरातील १८ डीपी रस्त्यासाठी जवळपास १०० कोटी रुपये मंजूर झाले असून १५ डिपी रस्त्याची कामे पूर्ण झाली आहेत. तसेच लहान रस्त्यासाठी जवळपास १०० कोटीचा निधी मंजूर झालेला आहे.